


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०८.०७.२०२६ | अंक नं. ०८४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020
















# खंडणी प्रकरणातील आरोपींच्या नातेवाईकांनी घातला 'पोलिसांनाच घेराव'

नगर - सावेडीतील पाईपलाईन रोडवरील हनुमाननगर कमानीसमोर एका कपड्याच्या दुकानदाराला बेदम मारहाण करून खंडणी मागितल्याच्या प्रकरणातील आरोपींना ८ जुलै रोजी तोफखाना पोलिसांनी पंचनाम्यासाठी आणि घरझडतीसाठी नेले असता आरोपींच्या नातेवाईकांनी आणि महिलांनी पोलिसांना घेराव घालत सरकारी कामात अडथळा आणला. तसेच यातील काही महिला पोलिसांवर धावून आल्याचा प्रकार सावेडीतील वैदूवाडी परिसरात घडला.

६ जुलै रोजी रात्री पाईपलाईन रोडवरील कपड्याच्या दुकानात घुसून जबरदस्तीने कपडे नेत असताना पैसे मागितल्याचा राग आल्याने दोघांनी दुकानकादारास मारहाण करुन खंडणी मागितली होती. या प्रकरणी दुकानदार आकाश प्रकाश शिंदे यांनी ११२ वर कॉल करुन पोलीस मदत मागितली होती. त्यावेळी तोफखाना पोलिसांचे पथक घटनास्थळी गेले असता यातील नितीन मच्छिंद्र शिंदे व त्याचा साथीदार विलास संतोष शिंदे (दोघे, रा. वैदूवाडी) यांनी पोलिसांना धक्काबुक्की केली होती. दरम्यान दुकानातील मारहाण आणि खंडणीप्रकरणी आकाश शिंदे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तसेच यात पोलिसांना धक्काबुक्की केल्याप्रकरणी आणि सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी वाढीव कलम लावण्यात आले होते. या घटनेतील विशाल संतोष शिंदे, नितीन मच्छिंद्र शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर घरझडतीसाठी व घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी नेले जात होते. त्यांना घरझडतीसाठी वैदूवाडी येथे नेले असताना आरोपींचे नातेवाईक व महिलांनी पोलिसांना घेराव घालत त्यांना नेण्यास मज्जाव करण्याचा प्रयत्न केला. तसेच काही महिलांनी पोलिसांच्या अंगावर धावून जात सरकारी कामात अडथळा आणला. यावेळी शहराचे पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील यांच्यासह महिला अंमलदार व इतर पोलिसांचे पथक उपस्थित होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ८ जुलै रोजी दुपारी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. महिला अंमलदार याबाबत फिर्याद देत असल्याचे तोफखाना पोलिसांनी सांगितले. *(छायाचित्र पान २ वर)*



**डोंगरावर ढगांची चादर...** चार दिवसांपासून सर्वत्र पाऊस सुरु असला तरी नगर तालुक्यात मात्र रिमझिम पाऊस पडत आहे. डोंगर रांगेत असणाऱ्या गोरक्षनाथ गड, मिरावली पहाड, चांदबीबी महाल या डोंगरावर जणू काही ढगांची चादर पसरल्याचे दृश्य दिसत आहे. (छायाचित्र - विजय मते)

# एकाच दिवसात मुळा धरणात दीड टीएमसी पाण्याची आवक; जोर वाढल्याने पाणलोटात १२३ मि.मी. पावसाची झाली नोंद

नगर - अहिल्यानगर शहराची तहान भागवणाऱ्या मुळा धरण क्षेत्रात जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठाही वेगाने वाढू लागला आहे. ८ जुलै रोजी सकाळी घेतलेल्या नोंदीनुसार एकाच दिवसात धरणात सुमारे दीड टीएमसी नवीन पाण्याची आवक झाली आहे. मुळा पाणलोट क्षेत्रात एकाच दिवसात सर्वाधिक १२३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. धरणाच्या पाणलोटात सध्या जोरदार पाऊस सुरु असल्यामुळे मुळा धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे.




मुळा धरणाचे पाणलोट क्षेत्र असलेले अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड परिसर आणि घाटमाथ्याचे पाणी थेट मुळा नदीत उतरते. पुढे ही नदी कोतूळ परिसरातून मुळा धरणाकडे वाहत येते. कोतूळ परिसरात ९२ मिमी पावसाची नोंद झाली. याच नदीवरील आंबित व पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले असून, नदीत मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. पांजरे परिसरात सर्वाधिक १२३ मिमी पाऊस झाला आहे. धरण पाणलोटातील हा सर्वाधिक पाऊस ठरला आहे. त्यामुळे मागील दोन दिवसात मुळा नदीतून धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु झाली आहे.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने ८ जुलै रोजी सकाळी ६ वाजता प्रसिद्ध केलेल्या धरणसाठा, विसर्ग आणि पर्जन्यमान अहवालानुसार जिल्ह्यातील भंडारदरा, निळवंडे व मुळा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात चांगल्या पावसाची नोंद झाली असून धरणांतील पाणीसाठ्यातही चांगली वाढ होत आहे.

मुळा धरणात सध्या ८६८६ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून तो ३३.४१ टक्के इतका आहे. ८ जुलै रोजी सकाळी घेतलेल्या नोंदीनुसार धरणात एकाच दिवसात १४६० दशलक्ष घनफूट म्हणजेच सुमारे दीड टीएमसी नवीन पाण्याची आवक झाली असून १ जूनपासून धरणात २३३० दशलक्ष घनफूट म्हणजे २.३३ टीएमसी नवीन पाणयाची आवक झाली आहे. मुळा धरण परिसरात १८ मिमी, तर १ जूनपासून १३५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मागील वर्षी याच तारखेपर्यंत १८४ मिमी पाऊस झाला होता.

दरम्यान, भंडारदरा धरणात आजअखेर ५८९७ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून तो ५३.४२ टक्के आहे. धरणात आज ८५१ दशलक्ष घनफूट पाण्याची आवक झाली असून १ जूनपासूनची एकूण आवक ३५३८ दशलक्ष घनफूट इतकी आहे. धरण परिसरात आज ८३ मिमी, तर १ जूनपासून एकूण ७१५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मागील वर्षी याच तारखेपर्यंत १३०५ मिमी पाऊस झाला होता.

निळवंडे धरणात सध्या २,२८२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून तो २७.३८ टक्के आहे. धरणात आज ४४३ दशलक्ष घनफूट पाण्याची आवक झाली असून १ जूनपासूनची एकूण आवक ११८५ दशलक्ष घनफूट आहे. धरण क्षेत्रात आज ८१ मिमी, तर १ जूनपासून ४१४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मागील वर्षी याच तारखेपर्यंत ५८६ मिमी पाऊस झाला होता.
















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आठ दिवसांत पाणी द्या, अन्यथा 'मटका फोडो आंदोलन'

### बोल्हेगाव येथील कातोरेनगरमधील १५० कुटुंबांचा मनपा आयुक्तांना इशारा

नगर - बोल्हेगाव येथील कातोरेनगर परिसरातील नव्याने विकसित झालेल्या वसाहतीत १५० कुटुंबांचा पाणीप्रश्न तातडीने सोडवा, अन्यथा महानगरपालिकेत मटका फोडो आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्थायी समितीचे सदस्य तथा नगरसेवक नवनाथ कातोरे यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे.

कातारे यांनी ८ जुलै रोजी सकाळी महापालिकेचे आयुक्त डांगे यांची भेट घेतली. यावेळी काजल कावरे, अलका मगर, प्रतिभा उगले, पुजा काळोखे, दिव्या भवार, मनिषा गवळी, प्रियंका अंत्रे, स्वप्नाली जगताप, सविता नागरगोजे, कल्पना कदम, रेणुका घोडके, शितल लंगोटे, अश्विनी गिरी, प्रियंका दिवे, सुनिता खेडकर, सोनाली खेडकर, सुमन घुले, आरती यादव, नम्रता मोरे, ताराबाई क्षीरसागर, सुप्रिया चव्हाण आदी महिला उपस्थित होत्या. कातोरे यांनी आयुक्तांसमोर या महिलांची व्यथा मांडून वास्तव स्थिती निदर्शनास आणून दिली.



महापालिका आयुक्तांना पाण्याबाबत निवेदन देताना नगरसेवक नवनाथ कातोरे. समवेत कातोरेनगर येथील महिला.

कातोरे म्हणाले, कातोरेनगर परिसरात नव्याने विकसित झालेल्या वसाहतीमध्ये सुमारे १५० कुटुंबे वास्तव्यास आहेत. या भागातील अंतर्गत पाणीपुरवठा पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, ही अंतर्गत लाइन मुख्य जलवाहिनीला न जोडल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. भाऊ पाटील चौक येथील मुख्य जलवाहिनीशी ही पाइपलाइन तातडीने जोडून परिसराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नगरसेवक नवनाथ कातोरे यांनी आयुक्तांकडे केली.

येत्या आठ दिवसांत ही मागणी पूर्ण न झाल्यास महापालिकेत मटका फोडो आंदोलन केले जाईल, असा इशारा कातोरे यांनी यावेळी दिला.

## छगन महाराज मालुसरे यांचे निधन



नगर - नगर-पाथर्डी रोडवरील कौडगाव जवळ असलेल्या बाळनाथ गड येथील महंत छगन महाराज मालुसरे (वय ८०) यांचे ८ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाळनाथ गडावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

छगन महाराज हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. या आजारपणातच आज दुपारी त्यांची प्राणज्योत मावळली.

## व्यंकटेश मडूर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रमीकनगर सावेडी येथील रहिवासी व्यंकटेश रामचंद्र मडूर (वय ७३) यांचे ८ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रविंद्र व धनंजय मडूर यांचे ते वडील होत.

## श्रीमती सुरेखाबाई म्हसे यांचे दु:खद निधन



नगर - केडगाव वैष्णवनगर येथील रहिवासी श्रीमती सुरेखाबाई सुरेश म्हसे (वय ६८) यांचे ७ जुलै रोजी रात्री दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ सुना, नातवंडे असा परिवार आहे. भूषण व राहूल म्हसे यांच्या त्या मातोश्री होत.

## दिपक शिंदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - लक्ष्मीनगर नागरदेवळे येथील रहिवासी दिपक पंढरीनाथ शिंदे (वय ४०) यांचे १ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, १ भाऊ, भावजय, पत्नी, २ मुले, पुतण्या असा परिवार आहे. प्रकाश शिंदे यांचे ते मोठे बंधू होत.

## श्रीमती सरसबाई कर्नावट याचे संथाराव्रतात निधन



पुणे - तळेगाव दाभाडे येथील रहिवासी श्रीमती सरसबाई मिठुलाल कर्नावट (वय ९३) यांचे ७ जुलै रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ८ जुलै रोजी तळेगाव दाभाडे येथील वनेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुनील व अनिल कर्नावट, सुशीला बरमेचा, रंजना लुणावत, नंदा छाजेड, साधना शेटीया यांच्या त्या मातोश्री होत.

## लक्ष्मण दासरी यांचे वृद्धापकाळाने निधन



पुणे - नवावाडा, नानापेठ येथील लक्ष्मण व्यंकटेश दासरी (वय ८०) यांचे ५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रशांत दासरी यांचे ते वडील होत.

## रमेश तुपे यांचे अल्प आजाराने निधन



वांबोरी - येथील रमेश बाबासाहेब तुपे (वय ३२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, दोन भाऊ असा परिवार आहे. वांबोरी येथील अशोकराव तुपे यांचे ते धाकटे बंधू होत.

## वासुदेव वाघमारे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील औषध व्यवसायिक व रमा मेडिकल्सचे संचालक वासुदेव रंगनाथ वाघमारे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. महिला मंडळाच्या ज्येष्ठ विश्वस्त शैलजा वाघमारे यांचे ते पती तसेच महाराष्ट्र बँकेचे निवृत्त अधिकारी जयंत वैद्य व श्याम वैद्य यांची ते मेहुणे होत. वाघमारे यांच्या इच्छेखातर त्यांचे नेत्रदान करण्यात आले. वाघमारे यांनी सुरुवातीस काही काळ श्रीरामपूरच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये विज्ञानाचे शिक्षक म्हणून काम केले. नंतर शिक्षकी पेशाचा राजीनामा देऊन ते मेडिकल व्यवसायात उतरले होते.

## दिलीप लबडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील महादेव मंदिर देवस्थानचे माजी अध्यक्ष व विश्वस्त दिलीप नारायण लबडे (वय ६८) यांचे अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे पश्चात असा परिवार आहे. अशोक लबडे यांचे थोरले बंधू, केंब्रिज इंग्लिश मिडियम स्कुलचे शिक्षक प्रसाद लबडे यांचे वडील, रोहित व राहुल लबडे यांचे चुलते होत.



वैदूवाडी येथे आरोपींना घरझडतीसाठी नेले असता महिला व नातेवाईकांनी पोलिसांना घेराव घालत आरोपींना नेण्यास मज्जाव केला.

## नाशिक येथील घाटमाथ्यावर अतिवृष्टीची तर अहिल्यानगरला मुसळधार पावसाची शक्यता

नगर - नाशिक येथील नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून ८ जुलै रोजी सकाळी ९ वाजल्यापासून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आला होता. दुपारपर्यंत १८ हजार ४०३ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, तसेच नदीपात्रातील साहित्य व जनावरे तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावीत, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाच्या पूर नियंत्रण कक्षाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले आहे.

नाशिक नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याच्या पाणलोटात जोरदार पाऊस सुरु असल्यामुळे बंधाऱ्यात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे ८ जुलै रोजी सकाळी बंधाऱ्यातून ६ हजार ३१० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन दुपारपर्यंत त्यामध्ये वाढ करून विसर्ग १८ हजार ४०३ क्युसेक करण्यात आला आहे.

दरम्यान हवामान विभागाने ८ जुलै रोजी नाशिक घाटमाथ्यावर अतिवृष्टीचा किंवा ढगफुटीसदृश्य पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून सोडण्यात येणाऱ्या विसर्गात टप्प्याटप्प्याने आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातही वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यर्ता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे गोदावरीसह इतर नदीपात्रालगतच्या परिसरातील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, नदीपात्रात कोणतेही साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित स्थळी हलवावीत. तसेच पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

नगर - भारतीय हवामान विभागाने ८ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यातील नद्यांमधील वाढता विसर्ग आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या तसेच धरण परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

सध्या जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांमध्ये विसर्ग सुरू असून ८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता भीमा नदीच्या दौंड पुलावरून ८५ हजार ७८४ क्युसेक, तर गोदावरी नदीपात्रात नांदूर मध्यमेश्वर धरणातून १८ हजार ४०३ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस झाल्यास भीमा व गोदावरी नदीच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच भंडारदरा, निळवंडे व मुळा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने धरणांमध्ये पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे धरण परिसरात येणाऱ्या पर्यटकांनी तसेच प्रवरा व मुळा नदीकाठावरील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी मेघगर्जना, वीज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना झाडाखाली अथवा जाहिरात फलकांच्या परिसरात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटी वादळादरम्यान कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये तसेच विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल, टॉवर्स, ध्वजांचे खांब, दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, ट्रान्सफॉर्मर तसेच अधांतरी लटकणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. वीज चमकत असताना मोकळ्या जागेत असल्यास गुडघ्यावर बसून हातांनी कान झाकावेत, डोके दोन्ही गुडघ्यांमध्ये ठेवावे आणि जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवावा. जुनाट, मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींमध्ये आश्रय घेऊ नये.

धरण व नदी परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्यात उतरू नये तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. नदी, ओढे व नाल्यांतील पाणीपातळी वाढत असल्यास प्रवाहापासून दूर राहून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. पुलांवर किंवा बंधाऱ्यांवरून पाणी वाहत असल्यास ते ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन किंवा दरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांनी वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे आणि घाट रस्त्याने प्रवास टाळावा. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची व जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाशी ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४०, ११२ किंवा १०७७ या टोल-फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'आम्हाला शिकवू द्या' मागणीसाठी ९ जुलैला 'राज्यव्यापी शाळा बंद आंदोलना'चा इशारा

### शिक्षक भारती संघटनेचे उत्स्फूर्त सहभागी होण्याचे आवाहन - सुनील गाडगे

नगर - राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीच्या वतीने आम्हाला शिकवू द्या या प्रमुख मागणीसाठी ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनाला शिक्षक भारती संघटनेने सक्रिय पाठिंबा जाहीर केला असून राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

शिक्षकांवरील वाढत्या अशैक्षणिक जबाबदाऱ्यांमुळे अध्यापनावर परिणाम होत असून, शिक्षकांना त्यांच्या मूळ अध्यापन कार्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, शिक्षण व्यवस्थेतील अन्यायकारक निर्णय मागे घेण्यात यावेत आणि प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढावेत, या प्रमुख उद्देशाने हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये सेवाज्येष्ठता व पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा सक्ती रद्द करणे, आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून वगळणे, बीएलओ व एसआयआरसारख्या अशैक्षणिक कामांतून शिक्षकांची मुक्तता करणे, पेन्शनविषयक प्रश्न मार्गी लावणे, संच मान्यतेबाबतचे प्रश्न सोडविणे, कनिष्ठ महाविद्यालयांतील अन्यायकारक संच मान्यतेचा पुनर्विचार करणे तसेच अंशतः अनुदानित शाळांना टप्पा अनुदानवाढ देणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

याबाबत सुनील गाडगे म्हणाले, शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, आज शिक्षकांना अध्यापनापेक्षा विविध अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे. 'आम्हाला शिकवू द्या' ही केवळ घोषणा नसून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा आणि शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेसाठीचा लढा आहे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकजुटीने उभे राहणे ही काळाची गरज आहे. ते पुढे म्हणाले, टीईटी सक्ती, बीएलओची कामे, संच मान्यता, पेन्शन, अंशतः अनुदानित शाळांचे प्रश्न यांसह अनेक प्रलंबित मागण्या शासनाकडे वारंवार मांडूनही त्यावर अपेक्षित निर्णय होत नाही. त्यामुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. ९ जुलै रोजी होणाऱ्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. शिक्षकांची एकजूटच आपल्या न्याय्य मागण्यांना बळ देईल आणि शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडेल.

शिक्षक भारती संघटनेच्या वतीने राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षण क्षेत्राशी संबंधित घटकांना या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, मोहंमद समी शेख, रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनी केले आहे.

## शिक्षकांची नेमणूक न झाल्यास शाळा बंद आंदोलन

नगर - अहिल्यानगर तालुक्यातील कामरगाव येथील जि. प. शाळा भाग-२ गावठाण मधील दोन्ही शिक्षकांना निवडणूक कामासाठी कार्यमुक्त केल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून कार्यमुक्त केलेल्या शिक्षकांच्या जागेवर पर्यायी व्यवस्था करत शिक्षक न दिल्यास शाळेला कुलूप ठोकून विद्यार्थी व पालकांसमवेत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा माजी सरपंच तुकाराम कातोरे व दुध संस्थेचे चेअरमन रविराज साठे यांनी प्रशासनाला दिला आहे.





जि. प. शाळा भाग-१ कातोरेवाडी मध्ये ६४ विद्यार्थी व भाग-२ गावठाणमध्ये २९ विद्यार्थी शिक्षण घेत असून पहिली ते चौथी या चार वर्गासाठी दोन्ही शाळेत प्रत्येकी २ शिक्षक कार्यरत आहेत. पैकी भाग-२ गावठाण मधील दोन्ही शिक्षकांना निवडणूक कामासाठी तब्बल एक महिन्यासाठी शालेय कामकाजातून कार्यमुक्त केले असून विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होणार आहे. हे नुकसान होऊ नये यासाठी तुकाराम कातोरे, चेअरमन रविराज साठे, बबनराव भुजबळ, मा. उपसरपंच अनिल आंधळे, डॉ. शुभम शिंदे यांच्या शिष्टमंडळाने पालकांच्या वतीने गट शिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांची भेट घेऊन चर्चा केली. शालेय अडचणी व पालकांचे म्हणणे सांगितले. व त्या आशयाचे लेखी निवेदन दिले. येत्या सोमवार पर्यंत पर्यायी शिक्षकांची व्यवस्था न केल्यास शाळेला कुलूप लाऊन तेथेच ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. खाजगी इंग्रजी शाळांमुळे जि. प. शाळांचा पट कमी होत असून शिक्षकांना पूर्ण वेळ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी देण्यात येत नाही तसेच वारंवार अशैक्षणिक कामे लादली जातात, त्याचा परिणाम जि. प शाळेत शिकणाऱ्या गरिब व शेतकऱ्यांच्या मुलांच्या प्रगतीला अडसर ठरत आहे. याबाबत शासन ठोस निर्णय घेत नाही हि शोकांतिका आहे.

### पालकांची तीव्र नाराजी

जिल्हा परिषद शाळेवर विश्वास दाखवत पालकांनी आपल्या विद्यार्थ्याचा प्रवेश घेतला. परंतु शिक्षकच नसल्याने विदयार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने पालकांनी शिक्षण विभागाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सध्या इयत्ता दुसरी व तिसरीच्या वर्गाचे पाठ्यपुस्तक बदलले असून नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण वर्ग सुरु आहेत. त्यातच काही शिक्षकांना निवडणुकीच्या कामात गुंतविले आहे. तसेच जनगणनेचे काम सुरु आहे, त्यामुळे शिक्षकांनी अध्यापन कधी व कसे करावे हा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे तुकाराम कातोरे म्हणाले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती ह्या विद्यमान मालक **भक्ती सारंग शुक्रे, अर्चना सचिन पाठक, ऋषिकेश सुरेश भोरे, तेजा समीर पाठक व श्रीधर चंद्रशेखर बर्वे** सर्व रा. सावेडी, अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकती आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकती लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, आन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे बुऱ्हाणनगर येथील सर्व्हे नं. ५१/२ मधील प्लॉट मिळकती खालीलप्रमाणे.

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | विद्यमान मालक | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ६० | ६७.७५ | भक्ती सारंग शुक्रे | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६१ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ५९ |
| ६१ | ६८.७५ | अपर्णा सचिन पाठक | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६२ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६० |
| ६२ | ६८.७५ | ऋषिकेश सुरेश भोरे | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६३ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६१ |
| ६३ | ६८.७५ | तेजा समीर पाठक | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६४ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६२ |
| ६४ | ६८.७५ | श्रीधर चंद्रशेखर बर्वे | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६५ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६३ |
| ६५ | ६८.७५ | | लागू सर्व्हे नं. ५० | प्लॉट नं. ६६ | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६४ |
| ६६ | ९४.५० | | लागू सर्व्हे नं. ५० | १२ मी. रस्ता | ६ मी. रस्ता | प्लॉट नं. ६५ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक संपूर्ण प्लॉटस् मिळकती व तदंगभुत वस्तु, वहीवाट, वागणुकीचे हक्कासह काहीही एक राखून न ठेविता असे.

अहिल्यानगर
दिनांक-०८/०७/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो. नं. ९८६०६४६४६३
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

# गृहिणी

## आरोग्य

### 'नेचर थेरपी' ठरेल वरदान

धावपळीच्या आयुष्यात आरोग्यासाठी केवळ चांगला आहार पुरेसा नसून निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणेही गरजेचे आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रात 'नेचर थेरपी' किंवा 'फॉरेस्ट बाथिंग' याला उत्तम औषध मानले गेले आहे. झाडांच्या सान्निध्यात राहिल्याने शरीरातील स्ट्रेस हार्मोन कमी होतात. झाडांतून निघणारे नैसर्गिक घटक श्वासाद्वारे आत गेल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. ज्यांना सतत मानसिक ताण, उच्च रक्तदाब किंवा डोकेदुखीचा त्रास आहे, त्यांच्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात घालवलेला वेळ रामबाण उपाय ठरतो. हिरवळीमुळे डोळ्यांचा थकवा दूर होतो आणि पहाटे गवतावर अनवाणी चालल्याने गाढ झोप लागण्यास मदत होते. आयुर्वेदातही निसर्गाला सर्वात मोठा डॉक्टर मानले आहे. कोणत्याही महागड्या औषधांशिवाय शरीराला निरोगी ठेवण्याचा हा सर्वात सोपा आणि विनामूल्य मार्ग आहे.

## पाककला

### इन्स्टंट ब्रेड रसमलाई

**साहित्य :** फ्रेश व्हाईट ब्रेड स्लाईस ५-६, फुल क्रीम दूध १ लिटर, साखर ५-६ मोठे चमचे (चवीनुसार), केशर ७-८ काड्या, वेलची पावडर १/२ चमचा, काजू, बदाम आणि पिस्त्याचे काप २-३ चमचे, कॉर्न फ्लोअर १ लहान चमचा (दूध लवकर घट्ट करण्यासाठी, ऐच्छिक).

**कृती :** सर्वप्रथम एका कढईत दूध गरम करायला ठेवा. दुधाला उकळी आली की आच मंद करा आणि दूध थोडे घट्ट होईपर्यंत आटवून घ्या. त्यात केशर, साखर आणि सुकामेव्याचे काप घाला. दूध थोडे आणखी घट्ट करण्यासाठी चमचाभर दुधात कॉर्न फ्लोअर मिक्स करून ते मिश्रण उकळत्या दुधात टाका आणि २ मिनिटे ढवळा. दूध आटून पाऊण लिटर झाले की गॅस बंद करा आणि त्यात वेलची पावडर टाका. तयार झालेली ही 'रबडी' पूर्णपणे थंड करून फ्रिजमध्ये ठेवा आता ब्रेडच्या स्लाईस घ्या आणि एका गोल वाटीच्या किंवा धारदार झाकणाच्या साहाय्याने त्यांचे गोल तुकडे (रसमलाईच्या आकाराचे) कापून घ्या. सर्व ब्रेडचे गोल तुकडे तयार ठेवा. सर्व्ह करताना एका खोलगट डिश किंवा बाऊलमध्ये हे ब्रेडचे गोल तुकडे ठेवा. त्यावर फ्रिजमधील थंडगार केशरयुक्त रबडी भरपूर प्रमाणात ओता, जेणेकरून ब्रेड ती छान शोषून घेईल. वरून थोडे पिस्त्याचे काप आणि केशर लावून सजवा.

## वास्तू

### देवघरातील दिवा

✻ देवघरातील दिव्याची ज्योत नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला असावी. पूर्व दिशेला ज्योत ठेवल्याने आयुष्य वाढते आणि उत्तर दिशेला ठेवल्याने धनवृद्धी होते असे मानले जाते.

✻ दिव्याची ज्योत कधीही दक्षिण दिशेला नसावी. विज्ञानाने आणि वास्तूने डाव्या-उजव्या बाजूचे महत्त्व सांगितले आहे.

✻ जर तुम्ही तुपाचा दिवा लावत असाल तर तो देवाच्या उजव्या बाजूला (आणि तुमच्या डाव्या हाताला) ठेवावा. जर तुम्ही तेलाचा दिवा लावत असाल तर तो देवाच्या डाव्या बाजूला (तुमच्या उजव्या हाताला) ठेवावा.

## सौंदर्य

✻ आठवड्यातून एकदा केसांना कोमट खोबरेल तेल किंवा बदामाच्या तेलाने मसाज करावा. तेल लावण्यापूर्वी त्यात थोडे लिंबाचे थेंब टाकल्यास कोंड्याची समस्या कमी होते.

✻ दही आणि अंड्याचा पांढरा भाग (किंवा मधाचे काही थेंब) एकत्र करून केसांना लावावे. अर्ध्या तासानंतर केस कोमट पाण्याने धुवावेत, यामुळे केसांना छान चमक येते.

## सल्ला

पुऱ्या लाटून झाल्यानंतर त्या तळण्यापूर्वी १० मिनिटे फ्रिजमध्ये ठेवाव्यात. यामुळे पुऱ्या तळताना जास्त तेल शोषून घेत नाहीत आणि छान फुगतात तसेच तेलकटपणाही कमी होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ९ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, अश्विनी १४|५६, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नवीन छंद जोपासण्यासाठी आजचा दिवस अत्यंत उत्तम आहे.

**वृषभ :** आज आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन दिनचर्या बदलावी लागेल. मनाचा कल अध्यात्माकडे झुकेल.

**मिथुन :** व्यवसाय भागीदारी किंवा नवीन करारासाठी आजचा दिवस शुभ आहे. आर्थिक बाजू मजबूत होईल.

**कर्क :** आज केलेल्या कठोर परिश्रमाचे अत्यंत गोड फळ तुम्हाला मिळेल.

**सिंह :** विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळेल. घरातील जेष्ठांचे मार्गदर्शन लाभून मौल्यवान वस्तूची खरेदी होईल.

**कन्या :** नवीन वाहन किंवा घर खरेदीच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा सुरू होईल.

**तूळ :** तुमच्या संवाद कौशल्यामुळे समाजात आज मोठी प्रतिष्ठा मिळेल. भावा-बहिणींशी असलेले मतभेद मिटतील.

**वृश्चिक :** आज बोलण्यावर संयम ठेवल्यास अनेक कठीण परिस्थिती टाळता येतील.

**धनु :** नवीन वस्त्र किंवा दागिने खरेदीचे योग असून स्वतःसाठी वेळ मिळेल.

**मकर :** कामाच्या अतिरेकामुळे आज शारीरिक आणि मानसिक थकवा जाणवू शकतो.

**कुंभ :** आजचा दिवस प्रगतीचा असून जुनी गुंतवणूक चांगला परतावा देईल.

**मीन :** करिअरमध्ये मोठे फेरबदल किंवा नोकरी बदलण्याचे विचार मनात येतील.

## शब्दगंध क्र. ७४६९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | | |
| | ■ | ९ | १० | | ■ | ११ | |
| ■ | १२ | ■ | १३ | | १४ | ■ | ■ |
| ■ | १५ | १६ | ■ | १७ | | १८ | १९ |
| २० | | | २१ | | ■ | २२ | |
| | ■ | २३ | | ■ | २४ | ■ | |
| २५ | | ■ | २६ | | | | |

**आडवे शब्द :-** १) मुभा; स्वातंत्र्य; मोकळीक ५) प्रपंच; संसार ७) ओकारी; उलटी; वांती ८) एक शस्त्र; समशेर ९) लगाम ११) झोप; निद्रा १३) सर्व; संपूर्ण; समस्त; सकल १५) गेय काव्य; गाणे; गीत १७) यज्ञकर्ता; मालक; नवरा; पती २०) उदाहरणासहित २२) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते पात्र २३) तीन गुणांपैकी एक; धूळ २५) निषध देशाचा राजा; दमयंतीचा पती २६) चलाख; ताजातवाना; हुशार

### शब्दगंध क्र. ७४६८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | न | स | स | रो | व | र | ■ |
| ला | व | ■ | फ | ड | ■ | च | ल |
| मा | रा | मा | र | ■ | क | ना | त |
| ल | ■ | प | र्व | बा | ■ | ■ | को |
| ■ | स | न | द | ■ | क | वा | ड |
| सं | प | ■ | ■ | क | ■ | ता | गा |
| ता | शे | रा | ■ | ल | ■ | य | ■ |
| प | ल | ख | ■ | प | प | न | स |

**उभे शब्द :-** १) वेगाने वाहणारी हवा; वारा २) एक प्रकारची दारू ३) कमतरता; उणीव; कसर ४) ग. दि. माडगूळकर अजरामर कलाकृती ५) एक देवी ६) वर देणारा; प्रसन्न १०) गोत्रजांचा समूह; नाते १२) मागणीचा लकडा १४) मला १६) कालवा; पाट १८) प्रतिस्पर्ध्यावरील वरचढपणा; विजय १९) नव्याने आलेला २०) शिडी ; पायरी; जिना २१) एक धातू; रुपे; चांदी २४) हेतू; योजना

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : मोठेपणा हा वयाने किंवा पैशाने मिळत नाही, तो तुमच्या विचारांनी आणि कर्माने मिळतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### उन्हाळ्यात मातीच्या माठातील पाणी थंड का राहते?

उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले की शीतकपाटातील (फ्रिजच्या) थंड पाण्यापेक्षा मातीच्या माठातील पाणी पिण्याला अधिक पसंती दिली जाते. माठातील पाणी आरोग्यदायी तर असतेच, पण ते पिऊन मिळणारे समाधान काही वेगळेच असते. आजच्या आधुनिक युगात घरात शीतकपाट असूनही अनेक जण आवर्जून मातीचा माठ वापरतात. विज्ञान आणि निसर्गाचा एक अप्रतिम मेळ यामागे दडलेला आहे. माठातील पाणी थंड राहण्यामागे एक अतिशय सोपी आणि महत्त्वाची वैज्ञानिक प्रक्रिया काम करते, ती म्हणजे 'बाष्पीभवन'.

या वैज्ञानिक प्रक्रियेची सुरुवात होते माठाच्या विशिष्ट रचनेपासून. मातीचा माठ बनवताना भाजलेल्या मातीमध्ये अत्यंत सूक्ष्म, डोळ्यांना न दिसणारी लाखो लहान छिद्रे तयार होतात. जेव्हा आपण माठात पाणी भरतो, तेव्हा या लहान छिद्रांतून पाणी अगदी संथ गतीने पाझरून माठाच्या बाहेरील पृष्ठभागावर येते. उन्हाळ्याच्या दिवसांत माठ बाहेरून स्पर्श केल्यावर नेहमी ओलसर किंवा थंड लागतात, ते याच कारणामुळे.

बाहेरील पृष्ठभागावर आलेले हे पाणी जेव्हा उन्हाळ्यातील उष्ण आणि कोरड्या हवेच्या संपर्कात येते, तेव्हा त्याचे बाष्पीभवन म्हणजेच वाफ होऊ लागते. विज्ञानाचा असा नियम आहे की, कोणत्याही द्रवाचे वाफेत रुपांतर होण्यासाठी उष्णतेची (उर्जेची) आवश्यकता असते, ज्याला आपण 'गुप्त उष्मा' असे म्हणतो. माठाच्या बाहेरील पाण्याचे बाष्पीभवन होण्यासाठी लागणारी ही उष्णता, ते पाणी माठाच्या आत असलेल्या पाण्यातून आणि माठाच्या भिंतींमधून शोषून घेते.

जेव्हा आतील पाण्याची उष्णता या बाष्पीभवनाच्या प्रक्रियेमुळे सतत बाहेर खेचली जाते, तेव्हा साहजिकच माठाच्या आतील पाण्याचे तापमान वेगाने कमी होते. उन्हाळ्यात बाहेर जितकी जास्त उष्णता आणि हवा जितकी कोरडी असेल, तितक्याच वेगाने हे बाष्पीभवन होते आणि माठातील पाणी तितकेच जास्त थंड राहते. तसेच माठातील पाणी थंड होणे हा देखील मातीची रचना, उष्णता आणि हवामान या घटकांचा एक सुंदर एकत्रित परिणाम आहे.

थोडक्यात सांगायचे तर, मातीचा माठ हा निसर्गाचा एक 'नैसर्गिक शीतकपाट' आहे. माठाच्या छिद्रांतून बाहेर पडणारे पाणी स्वतः वाफ बनून उडून जाते, पण जाताना आतल्या पाण्यातील उष्णता सोबत घेऊन जाते. यामुळेच कोणत्याही विजेचा किंवा कृत्रिम वायूचा वापर न करता, माठातील पाणी उन्हाळ्यातही अमृततुल्य, नैसर्गिकरीत्या थंड आणि आरोग्यदायी राहते.

### निसर्गाची शाळा

एका सुंदर गावात आनंद नावाचा एक लहान मुलगा राहत होता. तो हुशार होता, पण त्याला निसर्गाचे महत्त्व फारसे माहीत नव्हते. तो अनेकदा झाडांची पाने विनाकारण तोडायचा, बागेत कचरा टाकायचा आणि पाण्याचा अपव्यय करायचा. एकदा त्याच्या शाळेत उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये एक नवीन शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे प्रमुख होते 'गुरुजी'-जे खूप कडक आणि शिस्तप्रिय शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते.

शिबिराच्या पहिल्याच दिवशी गुरुजी सर्व मुलांना एका मोठ्या जंगलात घेऊन गेले. तिथे गेल्यावर त्यांनी सर्व मुलांना एक नियम घालून दिला, पुढील तीन दिवस आपण सर्वजण या निसर्गाच्या शाळेत राहणार आहोत. निसर्ग हाच तुमचा सर्वात मोठा शिक्षक आहे. तो आपल्याला भरभरून देतो, पण जर आपण त्याचा आदर केला नाही, तर तो आपल्याला कडक शिक्षाही करतो. आनंदने गुरुजींच्या या बोलण्याकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केले.

दुपारच्या वेळी आनंदला खूप भूक लागली. त्याने सोबत आणलेला डबा खाल्ला आणि जेवण झाल्यावर उरलेले अन्न व प्लास्टिकची पिशवी तिथेच एका सुंदर पाण्याच्या झऱ्याजवळ टाकून दिली. गुरुजींनी हे पाहिले, पण ते आनंदला काहीच बोलले नाहीत. दुसऱ्या दिवशी, गुरुजींनी सर्व मुलांना एका कडक उन्हात लांबवर फिरायला नेले. चालून चालून सर्व मुले खूप थकली आणि त्यांना तीव्र तहान लागली. आनंदने पाण्याच्या बाटलीकडे पाहिले, तर त्याची बाटली रिकामी झाली होती. तो धावतच कालच्या पाण्याच्या झऱ्याजवळ गेला. पण तिथे पोहोचताच त्याला धक्का बसला. काल त्याने टाकलेल्या कचऱ्यामुळे आणि प्लास्टिकमुळे त्या झऱ्याचे पाणी दूषित झाले होते आणि तिथून दुर्गंधी येत होती. ते पाणी पिण्यालायक राहिले नव्हते.

आनंद तहानलेला आणि व्याकुळ होऊन गुरुजींकडे गेला आणि म्हणाला, गुरुजी, मला खूप तहान लागली आहे, पण झऱ्याचे पाणी घाण झाले आहे. आता मी काय करू?

गुरुजी शांतपणे हसले आणि म्हणाले, आनंद, निसर्गाने तुला काल शुद्ध आणि थंड पाणी दिले होते. पण तू त्याचा आदर केला नाहीस. तू तिथे कचरा टाकलास आणि निसर्गाची हानी केलीस. आज निसर्गाने तुला पाण्याची किंमत काय असते, हीच शिक्षा दिली आहे. निसर्ग हा असा शिक्षक आहे, जो आधी परीक्षा घेतो आणि नंतर धडा शिकवतो. आनंदला आपली चूक कळून आली. त्याने लगेच त्या झऱ्याजवळचा सर्व कचरा साफ केला. निसर्गाचे हे कडक पण खरे रूप पाहून त्याच्या डोळ्यात पाणी आले. त्याने मनोमन ठरवले की आजपासून तो कधीही निसर्गाचे नुकसान करणार नाही.

तात्पर्य :निसर्ग हा आपला सर्वात मोठा आणि प्रामाणिक शिक्षक आहे. जर आपण निसर्गाचा आदर केला आणि त्याचे रक्षण केले. तर तो आपल्याला भरभरून देतो. परंतु, जर आपण त्याची हानी केली, तर त्याचे दुष्परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात.



## आत्मशक्ति

### त्यांनी लक्ष्य वेधले

पुष्कळांना तेथे इतका आनंद, सुख मिळाले की पुनः परतण्याची त्यांची इच्छा नव्हती; परंतु पृथ्वीवरील त्यांचे आयुष्य संपलेले नाही म्हणून त्यांना परत जावे लागेल, असे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी पुनः आपल्या शरीरात प्रवेश करीत असल्याचा अनुभव घेतला. त्याचवेळी डॉक्टर मंडळींची उपचार करण्याची धडपड यशस्वी झालेली व हृदयाचे ठोके व श्वासोश्वासाची हालचाल सुरु झालेली दिसली. सन १९८२ च्या गॅलप गणनानुसार अशा ८० लाख लोकांनी मृत्युसम अनुभव घेतलेले पहाण्यास मिळाले. एवढ्या मोठ्या आश्चर्यकारक लोक समूहाने (संख्येने) डॉक्टर लोकांचे व शास्त्रज्ञांचे लक्ष वेधले. डॉ. रेमण्ड मुडी ह्यांच्या ह्या पुस्तकाने तसेच डॉ. मेलवीन मोर्स ह्यांनी मृत्युसम अनुभव घेतलेल्या लहान मुलांवर केलेल्या संशोधनाबाबतच्या पुस्तकाने लोकांना ह्या गोष्टींची माहिती झाली. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यावर, ज्या लोकांना असे अनुभव आले, परंतु लोकलज्जेस्तव त्यांनी ते सांगितले. नव्हते, त्यांनीही तसे सांगावयास सुरुवात केली. प्रसार माध्यमांनीही चांगले काम केले. दूरदर्शन, पुस्तके, सिनेसृष्टीच्या माध्यमांकडूनही या अनुभवांना खूप प्रसिद्धी दिली गेली. तर हे 'मृत्युसम अनुभव' आत्म्याचे अस्तित्त्व स्पष्ट करते काय ? होय. कारण ज्यांना अनुभव आले आहेत त्यांना ही बाब स्पष्ट होतेच. त्यांची वर्णने अगदी स्पष्ट रूपाने, जोमदारपणे सांगतात की या जीवनानंतर जीवन आहे. प्रत्यक्षात ह्या लोकांपैकी अनेकांना आलेले हे अनुभव इतके जीवंत, सुस्पष्ट व वास्तवपूर्ण होते की, त्यांना ह्या पृथ्वीवर असे अनुभव एवढे स्पष्ट व सजीव दिसले नाहीत. ज्या खोलीत त्यांचे मृत शरीर पडले होते, त्या खोलीबाहेर बसलेल्या लोकांची संभाषणे त्यांच्या आत्मरुपाने ऐकली, त्याबाबतचा खरेपणा त्यांना नंतर पुनः शरीर प्रवेशानंतर समजला, एवढेच नव्हे तर काही लोकांचे आत्मे आपल्या दूरवरच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचले.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### स्पर्धा भय

जिवंत किंवा टिकून राहण्याच्या भावासह आपण स्पर्धा, भय आणि क्रोध यांना जन्म देतो. सेवाभावामध्ये, सहकार्य, परस्परांत वाटणे, काळजी घेणे इत्यादी भाव आपण निर्माण करतो. परिणामी आपण भावनिक पातळीवर कणखर बनतो.

जीवन जगण्याची कला : 'दान'

सुरेश ओबेरॉय :

निसर्ग आपल्याला बिनशर्त देत असतो. पण आपल्याला मात्र सुरुवातीपासूनच - 'जर तुम्ही दान दिलं तर तुम्ही यशस्वी व्हाल', 'एखादं जोडपं एखाद्या विशिष्ट ठिकाणी गेलं तर त्यांना मूल होईल' हे आणि असंच शिकवलं जातं. कुठल्याही प्रकारचं दान हे काहीतरी मिळवण्यासाठीच केलं जातं. शिवानीदीदी : प्रत्येक कर्म करताना त्यामागचा हेतू आपण तपासायला हवा. कर्म करताना जर ते निःस्वार्थपणे केलं तर ते कर्म करणारा आत्मा वेगळ्याच पातळीवर सशक्त होईल. जर आत्मा काही मिळवण्याच्या हेतूने दान करत असेल तर चांगल्या कर्मामुळे तो सशक्त तर होईल पण त्याची सशक्ततेची पातळी थोडी कमी असेल.

तुम्ही असा उल्लेख केला की, आपण प्रत्येक गोष्ट देण्याच्या बदल्यात काही मिळवायला शिकलो आहोत. पण दान असं द्यावं की एका हाताने दिलं तर ते दुसऱ्या हातालाही कळता कामा नये असंही आपण शिकलो आहे. आपल्याला गुप्त दानाच्या महापुण्याबाबतही सांगितलं गेलं आहे. गुप्तपणे केलेलं दान हेच सकारात्मक कर्म आहे.

सुरेश ओबेरॉय :

पण ह्याचा लाभ मला कसा होईल?

शिवानीदीदी :

ह्याचा लाभ म्हणजे, आपण निःस्वार्थ कर्म जेवढं जास्त करू, जेवढं जास्त देत राहू, आपल्यातील ऊर्जा तेवढी जास्त प्रवाही राहील. शरीरात रक्तप्रवाह सुरळीत असणं हे चांगल्या तब्येतीचं लक्षण आहे. जर रक्तप्रवाह थांबला किंवा

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, लग्न झाल्यावर आपल्यातलं प्रेम खूपच कमी झालंय.

नावरा : अरे वेडे, असं काही नाहीये...

बायको : नाही हो, आता तुम्ही माझ्यावर अजिबात लक्ष देत नाही.

नवरा : अगं, परीक्षेचा निकाल लागल्यावर कोणी अभ्यास करतं का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताचे 'पॅरिस' कोणत्या शहराला म्हटले जाते?

- जयपूर (राजस्थान)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### भेंडी

नाजूक, लुसलुशीत भेंडीची भाजी ही सर्वांच्याच परिचयाची व आवडती आहे. तिच्या नाजूकपणामुळेच तिला इंग्रजीमध्ये स्त्रीच्या बोटांची उपमा दिली आहे. भेंडीचे रोप हे साधारणतः कमरेइतक्या उंचीचे असून, एकदम ताठ उभे असते. त्याच्या दांडीवर काटेरी लव असते. त्याची पाने एरंडाच्या पानाप्रमाणे मोठ्या आकाराची असतात. या पानांच्या मध्ये फूल येऊन प्रत्येक फुलाला भेंडी लागते. भेंडी म्हणजे त्या रोपाचे फळ होय. पावसाच्या सुरुवातीला पाऊस पडल्यानंतर साधारणतः जून-जुलै (ज्येष्ठ, आषाढ), तर थंडीत साधारणतः डिसेंबर महिन्यात अशाप्रकारे दोनदा भेंडीची लागवड केली जाते. भेंडीचे मूळ स्थान आफ्रिका आहे. त्यानंतर त्याचे संपूर्ण जगभरात उत्पादन घेतले जाऊ लागले. बोटाच्या आकाराची व लांबीची भेंडी गडद हिरव्या रंगाची असते व तिच्या आतमध्ये पांढऱ्या शुभ्र लहान मोत्यांप्रमाणे बिया असतात. मराठीत 'भेंडी', हिंदीमध्ये 'भिंडी', संस्कृतमध्ये 'भिण्डिका', इंग्रजीमध्ये 'लेडी फिंगर, तर शास्त्रीय भाषेत 'अबेलमोचस एस्कुलेन्थस' या नावाने भेंडी ओळखली जाते...

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : भेंडी ही वात व कफकारक, आम्लग्राही गुणधर्मांची, पौष्टिक, वीर्यवर्धक, रुचिकारक आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : भेंडीमध्ये कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, फॉस्फरस, पोटॅशिअम, थायमिन, लोह, कॅरोटीन, रिबोफ्लेविन, नायसिन, प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, तसेच 'अ' व 'क' जीवनसत्त्व ही सर्व घटकद्रव्ये विपुल प्रमाणात असतात.

उपयोग : १) भेंडीमध्ये कॅल्शिअम 'अ' व 'क' जीवनसत्त्वे विपुल प्रमाणात असल्याने हाडे ठिसूळ होणे, सांधेदुखी, गुडघेदुखी व कंबरदुखी या आजारांमध्ये रोज सात-आठ कोवळ्या भेंड्या चिरून त्याचा एक लिटर पाण्यात काढा करावा. हा काढा एक ग्लास उरेपर्यंत आटवावा. अनुशापोटी हा काढा. त्यांनी त्यांची संभाषणे ऐकली. ह्या साऱ्या अनुभवांच्या खरेपणामुळे, आत्म्याच्या अस्तित्त्वाबद्दल यांच्या मनात काहीच संशय राहिला नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




प्रयास दादी–नानी ग्रुपने महापालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या 'हरित शहर' अभियानात सक्रिय सहभाग नोंदवल्याचे पहिल्या छायाचित्रात तर योग, निसर्गोपचारावर मार्गदर्शन करताना हेमा सेलोत.

# 'निरोगी आरोग्याचा कानमंत्र घेऊन महिलांचा हरित शहर'चा संकल्प

**योग, निसर्गोपचार आणि वृक्षलागवडीचा संगम; निरोगी जीवनशैलीचे धडे; प्रयास दादी–नानी ग्रुपचा पुढाकार**

नगर – महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक व्हावी आणि प्रत्येक घरातून हरित शहराच्या संकल्पनेला बळ मिळावे, या उद्देशाने प्रयास दादी–नानी ग्रुपने महापालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या 'हरित शहर' अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमात महिला सदस्यांना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वतीने विविध देशी वृक्षांची रोपे वितरित करण्यात आली. महिलांनी आपल्या घराच्या अंगणात, परिसरात आणि उपलब्ध जागेत वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

याच कार्यक्रमात महिलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी निसर्गोपचार, योग, संतुलित आहार आणि मानसिक स्वास्थ्यविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैली या दोन्हींचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम महिलांसाठी प्रेरणादायी ठरला.

निसर्गोपचार तज्ज्ञ हेमा सेलोत यांनी 'आहार, व्यायाम आणि निरोगी आरोग्य' या विषयावर अत्यंत मार्गदर्शक व्याख्यान दिले. त्यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनात नैराश्य, तणाव आणि मानसिक अस्वस्थता ही अनेक गंभीर आजारांची प्रमुख कारणे बनत आहेत. या समस्यांवर औषधांपेक्षा सकारात्मक विचार, नियमित योग, ध्यान आणि शिस्तबद्ध जीवनशैली हा अधिक प्रभावी उपाय आहे.

त्या म्हणाल्या, महिलांनी प्रथम स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. दिवसाची सुरुवात सकारात्मक विचारांनी, योगाभ्यासाने आणि प्राणायामाने झाली तर संपूर्ण दिवस उत्साही राहतो. सात्विक, संतुलित आणि पौष्टिक आहारामुळे अनेक आजारांपासून संरक्षण मिळते. ऋतूनुसार उपलब्ध फळे, भाज्या आणि नैसर्गिक रंगांनी समृद्ध अन्नपदार्थांचा आहारात समावेश करावा. मन आणि शरीर निरोगी ठेवण्यासाठी स्वतःवर प्रेम करणे आणि स्वतःची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरल्या त्या प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा वयाच्या साठीनंतरही त्यांनी अत्यंत अवघड योगासने सहजतेने करून उपस्थित महिलांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. त्यांच्या लवचिकतेने आणि उत्साहाने उपस्थित महिलांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. यावेळी त्यांनी सांगितले, योग हा एका दिवसाचा चमत्कार नसून सातत्यपूर्ण साधना आहे. गेल्या पस्तीस वर्षांपासून मी नियमित योगाभ्यास, योग्य आहार आणि शिस्तबद्ध दिनचर्या पाळत आहे. त्यामुळेच आजही मी निरोगी आणि ऊर्जावान आहे. प्रत्येक महिलेने दररोज किमान काही मिनिटे योगासाठी द्यावीत. निरोगी शरीर आणि शांत मन हेच आयुष्यातील खरे वैभव असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास प्रयास ग्रुपच्या उपाध्यक्षा राजश्री शितोळे, दादी–नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, ह.भ.प. प्रभाताई भोंग, उपाध्यक्षा सुचेता बोरकर, सचिव उज्वला बोगावत, खजिनदार मेघना मुनोत, तसेच शामल शिंदे, सुनिता काळे, वर्षा गांधी, सुनीता चक्रवर्ती, गीता कवाने, कविता शिंगवी, छाया भंडारी, प्रिया गुंदेचा, प्रतिभा भिसे, आरती थोरात, लीला अग्रवाल, सुजाता कदम, उषा सोनी, नीलिमा पवार, अलका वाघ, सुरेखा जंगम, शशिकला झरेकर, प्रतिभा रासकर, हेमा पडोळे, शकुंतला जाधव, आशा गायकवाड, ॲड. ज्योत्स्ना कुलकर्णी, संगीता डिडवानी, सविता धामट, रेखा फिरोदिया यांच्यासह महिला सदस्य उपस्थित होत्या.

प्रास्ताविकात प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, प्रयास ग्रुप मागील अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक आणि बौद्धिक उपक्रम राबवत आहे. महिलांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांचे आरोग्य जपणे आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढविणे हा आमच्या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. वर्षभर योग शिबिरे, आरोग्य मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि विविध स्पर्धांचे आयोजन करून महिलांना सकारात्मक आणि सक्रिय जीवनशैलीकडे प्रेरित केले जाते असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेच्या कमिटीवर निवड झाल्याबद्दल ॲड.रवींद्र शितोळे यांचा प्रयास ग्रुपच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यानंतर महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक, बौद्धिक आणि ज्ञानवर्धक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

यावेळी ह.भ.प. प्रभाताई भोंग यांनी धार्मिक, सामाजिक आणि आरोग्य जनजागृतीसाठी प्रयास ग्रुप व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. समाजातील महिलांना एकत्र आणून त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य या संस्था प्रभावीपणे करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. राजश्री शितोळे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दीपा सोनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## गुणग्राहकता हवी



त्याच्यात असतो दोष. आणि कुणी दाखवला, तर होतो त्याचा रोष. पण लोकांनाही. नसता छंद दुसऱ्यांचे दोष काढण्यातच आनंद, वर्तमानपत्रांना पत्र लिहितील. दुसऱ्यांच्या दोषांचा डांगोरा पिटतील, अरे पण तुझ्यात काय दोष कमी? तू अगदी धुतल्या तांदळासारखा याची काय हमी? अरे माणसा, दुसऱ्याचे दोष दिसले, तर आपल्यातले तपासून पाहिले आणि तसेच दिसले, तर ते घालवले. हेच सज्जन माणसाचे लक्षण भले. शिवाय दुसऱ्याचे दोष दाखवले, यात स्वतःचे काय हित साधले? उगाच हजार शत्रू निर्माण केले. त्यापेक्षा आपल्यातलेच दोष शोधावेत. स्वतःसमोरच मांडावेत. त्यांची बाळगावी खंत. मनाला सांगावे, कसे रे तुला हे पसंत ? महाभारतकार व्यास म्हणतात, खलः सुर्षपमात्राणि परिच्छद्राणि पश्यति। आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ।

दुसऱ्याचे नेहमी उणेच पाहायचे. कितीही क्षुल्लक का असे ना ते? कित्येकदा ते अगदी दिसते न दिसते, असे असते. उलट स्वतःचे दुर्गुण केवढे ठळक ! चटकन नजरेत भरतात भडक. पण मला नाहीच ते दिसत. आणि दिसले, तरी नाही मी ते मान्य करत ।

स्वतः गुणसंपन्न असला, तर तो दुसऱ्याचे दोष पाहतोच कशाला? गुणग्राही लुब्ध होतो, दिसला कुणातही गुण तरी. म्हणून रविंद्रनाथ टागोर म्हणतात. तुमि केमन करे गान करो जे गुणी। अवाकयेशुनि, केवल शुनि ।। ज्याला सूर समजतात त्यालाच सुरांची मोहिनी पडते. गा रे गुणवंता, गा! तुझ्या गाण्यातले गुण गाताना माझी वाणी कुंठित होते. फक्त तुझ्या गाननैपुण्यावर ती मोहित होते. लुब्ध होऊन भान हरपते. फक्त ऐकणेच ऐकते. म्हणून सदैव सेवावेत सद्गुणच दुसऱ्यांचे. खवखव लागावी तशी. मग दोषच पाहण्याची दुर्बद्धी होईल कशी? संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

सांगे कुमुददळाचेनि ताटे तो जेविला चंद्रकिरणे चोखटे । तो चकोर कायि वाळवंटे। चुंबितु असे ? उत्फुल्ल कमलिनींच्या ताटात अमृतमय चंद्रकिरणांचीच सदा चव चाखणारा चातक, कधी वाळू चाटताना पाहिलाय का कुणी चुकून तरी ?

डॉ. विल्किन्सन नावाच्या एका आयरिश रेव्हरंडनं लिहिलेल्या आठवणींच्या पुस्तकातली ही गोष्ट. धर्मोपदेशकांना प्रशिक्षण देणाऱ्या चर्चमध्ये हे घडले. तिथे एकदा एक तरुण भरती झाला. तो धर्मोपदेशकांचे प्रशिक्षण घेऊ लागला. रोज वेगवेगळे धर्मगुरू बायबलवर बोलत. हा तरुण सगळ्याचे दोष काढी. स्वतःची प्रौढी मिरवी. तो होता पूर्वी नाटक कंपनीत. म्हणायचा कृतीशिवाय संवाद साधता येत नाही. बोलण्याबरोबरच ॲक्शन हवी.

मग त्यालाच एक दिवस उपदेशपर व्याख्यान द्यायला सांगितले. त्याने चर्चेचे छत न्याहाळले. छतात होती एक फट. तशीच एक छान बसता येईल अशी तुळई. त्याचे व्याख्यान होणार होते कृतिशील. विषय होता, पवित्र भूत. (होली घोस्ट)

त्याने व्याख्यानं व त्याबरोबर ॲक्शन व्हावी म्हणून केली युक्ती. मित्राला बसवायचे छतातल्या तुळईवर. पांढऱ्या कबुतराला म्हणायचे होली घोस्ट. त्याला शिकवायचे उडत येऊन त्याच्या खांद्यावर बसायला. ते वरून सोडायचे छतातल्या फटीतून युक्तीनुसार सगळी रचना पार पडली. आता व्याख्यान सुरू झाले. होली घोस्ट असे मग खाली उतरत असते. असे त्याचे वाक्य येताच ते पांढरे कबुतर मित्र सोडणार. कबुतर उडत येउन त्या व्याख्यात्याच्या खांद्यावर बसणार. व्याख्यान केवढे प्रभावी होणार. तो सगळ्या धर्मगुरूंवर मात करणार ! असेच त्याच्या मनात होते.आणि व्याख्यानात होली घोस्ट असे मग खाली उतरते, हे वाक्य आले आणि व्याख्यात्याने खांद्याकडे पाहिले. पण कबुतराचा पत्ताच नाही. त्याने ते वाक्य पुन्हा जोराने म्हटले, तरी कबुतर आलेच नाही. उलट मित्राचा पुटपुटल्याचा आवाज आला आणि तो सगळ्या श्रोत्यांनाही ऐकू गेला. मांजराने खाल्ले; आता काळे मांजरच खाली टाकू का?

सगळे चर्च हास्यात बुडाले. दुसऱ्याला हसता, तसे हसे स्वतःचेच होते. – **किशोर गांधी**

# अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या अध्यक्षपदी डॉ. राजा ठाकूर



जिल्हा वाचनालयाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कार्यवाह विक्रम राठोड यांच्या हस्ते डॉ. राजा ठाकूर व राहुल तांबोळी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**सहसचिवपदी राहुल तांबोळी यांची सर्वानुमते निवड**

नगर – अहिल्यानगर जिल्हा वाचनालय या संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत डॉ. राजा ठाकूर यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच राहुल तांबोळी यांची सहसचिवपदी सर्वानुमते निवड झाली आहे.

डॉ. राजा ठाकूर हे गेली अनेक वर्षे अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात सहकार्यवाह व संचालक म्हणून कार्यरत असून संस्थेच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. डॉ. ठाकूर यांनी अकोले तालुक्यातील वनवासी कल्याण आश्रमामार्फत दुर्गम भागात सामाजिक सेवेचे उल्लेखनीय कार्य केले आहे. तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये अनेक वर्षे सक्रियपणे कार्यरत राहून युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी योगदान दिले आहे. देशपातळीवरील आयुर्वेद व्यासपीठाच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून विविध जबाबदारीच्या पदांवर कार्य करत आयुर्वेद क्षेत्राच्या विकासासाठी योगदान दिले आहे. सावेडी येथील धर्माधिकारी मळ्यात साकारलेल्या 'धन्वंतरी उद्यान' उभारणीतही त्यांचा प्रमुख सहभाग राहिला आहे.

जिल्हा वाचनालयाच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर कार्यवाह विक्रम राठोड यांच्या हस्ते डॉ. राजा ठाकूर व राहुल तांबोळी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई, खजिनदार तनवीर खान, किरण अग्रवाल, शिल्पा रसाळ, प्रा. ज्योती कुलकर्णी, प्रा. मेधा काळे, अजित रेखी, डॉ. शैलेंद्र पाटणकर, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# नगरकरांना भावली... 'बबन्या, माय व जानरावची धमाल'; वऱ्हाडचा बहुपात्री प्रयोग रंगला, हशा व टाळ्यांची उत्स्फूर्त दाद

नगर – वऱ्हाडकार प्रा. लक्ष्मण देशपांडे यांनी अजरामर केलेली बबन्या, माय, जानराव, काशिनाथ, मंदी, ज्युडी ही पात्रे प्रत्यक्षात अवतरली आणि त्यांनी नगरच्या माऊली सभागृहात धमाल उडवून दिली...नगरकरांकडून टाळ्या व हशांची दाद मिळवून गेली. १६ महिलांनी उभी केलेली ५२ पात्रे नगरकरांना एव्हढी भावली की, अनेकांना या कलावंतांसमवेत फोटो घेण्याचा व सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही. काहींनी तर चक्क या कलावंतांच्या सह्याही घेतल्या...



नगरमधील जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांच्या पुढाकाराने उदयोन्मुख कलावंतांना कलाविष्काराची संधी देण्यासाठी वाडियापार्क क्रीडा संकुल आवारात लोकमान्य टिळक पुतळ्याजवळ गेल्यावर्षी मा. आ. स्व. अरुणकाका जगताप कलाकार कट्टा उपक्रम सुरू केला गेला. या कट्ट्याच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त माऊली सभागृहात वऱ्हाड निघालंय लंडनला या प्रसिद्ध एकपात्री नाटकाच्या बहुपात्री रुपांतरणाचा अभीनव प्रयोग आयोजित करण्यात आला होता. पुण्यातील शिवसागर रेसिडेन्सी या वसाहतीतील हौशी महिलांनी हा बहुपात्री प्रयोग दमदारपणे सादर केला. ज्यांनी प्रा. देशपांडे यांचे एकपात्री वऱ्हाड पाहिले आहे, त्यांना त्याची बहुपात्री रचना जाम आवडली.

वऱ्हाड निघालंय लंडनला या नाटकात प्रा. देशपांडे यांनी एकट्याने सादर केलेली सर्वच्या सर्व ५२ पात्रे बहुपात्री करताना १६ महिलांनीच उभी केली होती. या प्रयोगातील सर्व महिला उच्चशिक्षित आणि प्रतिष्ठित संस्थांमध्ये उच्चपदस्थ आहेत. अबोली जोशी–पोतनीस (बबन्या), अपर्णा सरनोबत (बाप्पा), रेवती वेखंडे (माय), अदिती मांद्रेकर (जानराव), शुभांगी पांगरीकर (नारायणराव आणि ज्युडी), अनघा धोपाटे (वेंधळी मंदी) प्रियांका जोशी (शास्त्रीबुवा), तनया कोदे (बिनकामाच्या वन्स), ज्युडीची आई आणि दिग्दर्शक श्रुती धानोरकर, गौरी रोडे (काशिनाथ) व सूत्रधार सुकृत सरनोबत यांनी नाटकाचे सादरीकरण झकास केले. बबन्याचं मोडकंतोडकं इंग्रजी, जानरावचा ब्रिटीश लहेजा, मायचं लचकणं–मुरडणं, मंदीचा वेंधळेपणा, बिनकामाच्या वन्संचा तोरा तसेच बुंगमध्ये (विमान) बसण्याची धमाल,तेथील सिक्युरिटी चेकिंग, विमानातील फुकटच्या चॉकलेट–बिस्किटावर तुटून पडलेली पोरंसोरं...सारं नाट्य नगरकर रसिकांना खळखळून हसवून गेलं. क्लोथ क्लोथ बस्ता... होल वावर इज अवर...असे नाटकातील प्रसिद्ध डायलॉग दाद मिळवून गेले. आरजे कोमल हिने स्वागत केले.

सुहास मुळे यांनी प्रास्ताविकात कलाकार कट्ट्याची संकल्पना उत्कृष्ट कवितेच्या रूपात मांडली. वर्हाडची बहुपात्री रचना हा नवा प्रयोग असल्याने तसेच यातील काही हौशी महिला कलावंत अहिल्यानगरच्या असल्याने त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळण्यासाठी या प्रयोगाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. नगरकर रसिकांनी या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाला दाद दिल्याबद्दल आभारही मानले.

या प्रयोगानंतर आमदार संग्राम जगताप यांनी कलावंतांची भेट घेऊन त्यांचे कौतुक केले. यावेळी नगरसेवक निखील वारे, डॉ. सागर बोरुडे, महेश लोंढे तसेच नाटकाचे ध्वनी संयोजक राजू ढोरे आदी उपस्थित होते.

# कोरियातील आंतरराष्ट्रीय परिषदेत नगरचे डॉ.आशुतोष गारुडकर यांचे संशोधन सादर



सियोल, दक्षिण कोरिया येथे झालेल्या AMWC Korea २०२६ आंतरराष्ट्रीय परिषदेत अहिल्यानगरचे त्वचारोगतज्ज्ञ डॉ.आशुतोष अरुण गारुडकर यांनी सहभाग नोंदवला.

नगर – सियोल, दक्षिण कोरिया येथे झालेल्या AMWC Korea २०२६ आंतरराष्ट्रीय परिषदेत अहिल्यानगरचे त्वचारोगतज्ज्ञ डॉ.आशुतोष अरुण गारुडकर यांनी सहभाग नोंदवला. यापरिषदेत त्वचारोग, सौंदर्य चिकित्सा, केसांचे उपचार, अँटी–एजिंग आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ सहभागी झाले होते.

या परिषदेत डॉ.गारुडकर यांनी केसगळतीमध्ये एक्सोसोम्स आणि चेहऱ्यावरील पिग्मेंटेशनसाठी सर्वात आधुनिक उपचारपद्धती या विषयांवरील आपले संशोधन कार्य सादर केले. कोरियन स्किन केअर, एक्सोसोम्स, पीडीआरएन, लेझर आणि आधुनिक त्वचा–पुनरुज्जीवन उपचारांबाबत त्यांनी जागतिक तज्ज्ञांशी चर्चा केली.



डॉ.गारुडकर हे डर्ममेडिका क्लिनिक, दिल्लीगेट व केडगाव, अहिल्यानगर येथे त्वचा, केस, पिग्मेंटेशन, लेझर आणि अँटी–एजिंग, लाँगेविटी उपचार सेवा देतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वात अद्ययावत व सुरक्षित उपचार पद्धती अहिल्यानगर मधील रुग्णांपर्यंत पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# नितीन कोलते यांना पीएच.डी. पदवी प्रदान



नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी संशोधन केंद्रासाठी आजचा दिवस अभिमानाचा ठरला. संशोधक नितीन कोलते यांना ६ जुलै रोजी हिंदी विषयातील 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.)' ही पदवी बहाल करण्यात आली.

श्री. कोलते यांनी श्रीलाल शुक्ल एवं सुभाष भेंडे के उपन्यासों में मूल्य संक्रमण : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर आपला संशोधन प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला. या संशोधनामध्ये हिंदी आणि मराठी साहित्यातील दोन महत्त्वाच्या कादंबरीकारांच्या साहित्यामधून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, नैतिक व धार्मिक मूल्यांतील संक्रमणाचा तुलनात्मक आणि चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. मौखिक परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

या संशोधनकार्याला न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. हनुमान जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे व सातत्यपूर्ण प्रेरणेमुळे संशोधकाला ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी साध्य करता आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी नितीन कोलते यांचे अभिनंदन करताना संशोधनाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा देणे हे उच्च शिक्षणाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट असल्याचे सांगितले. त्यांनी ही उपलब्धी महाविद्यालय आणि हिंदी संशोधन केंद्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले.

हिंदी विभागातील प्रा. अशोक गायकवाड, डॉ. सुनीता मोटे, प्रा. कोल्हे सर तसेच डॉ. कडाले मॅडम यांनीही नितीन कोलते यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व संशोधन कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार ॲड. श्रीमती दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, तसेच संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य यांनी नितीन कोलते तसेच त्यांचे संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. हनुमान जगताप यांचे अभिनंदन करून ही उपलब्धी संस्थेसाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रासाठी गौरवास्पद असल्याचे सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'बोल फाऊंडेशन' तर्फे विद्यार्थी–विद्यार्थ्यांना शालेय संचाचे वाटप



बोल फाऊंडेशनच्या शैक्षणिक उपक्रमाद्वारे भिंगार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद या शाळेत इयत्ता १ ली ते १० वी विद्यार्थी–विद्यार्थ्यांना शालेय संचाचे वाटप करण्यात आहे.

**स्वप्नाद्वारे प्रयत्न व कष्टाने जीवन यशस्वी करावे : सुदीप अगरवाल**

नगर – सालाबादप्रमाणे बोल फाऊंडेशनच्या शैक्षणिक उपक्रमाद्वारे ३ जुलै रोजी भिंगार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद या शाळेत इयत्ता १ ली ते १० वी विद्यार्थी–विद्यार्थ्यांना शालेय संचाचे वाटप करण्यात आहे. प्रमुख पाहुणे श्रीजी ग्रुपचे संचालक सुदीप अगरवाल व सौ. स्मिता अगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलनाद्वारे करण्यात आली.

संस्थेच्या सल्लागार श्रीमती उषा मेनन यांचीही उपस्थिती प्रार्थनीय ठरली. सर्वप्रथम प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल व सौ. स्मिता अगरवाल यांचा प्रवेशद्वारात विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

सुरूवातीला शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी स्वागत केले व फाऊंडेशन करीत असलेल्या उदात्त सामाजिक कार्याबद्दल आस्था व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल यांनी आपल्या संदेशाद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांने सकारात्मक स्वप्न पहावे आणि प्रयत्न व कष्ट करून भावी जीवनात यश संपादन करावे हा संदेश प्रभावीपणे दिला. त्याचप्रमाणे भारताचे माजी राष्ट्रपती स्व. अब्दुल कलाम आझाद यांच्या जीवनचरित्राच्या उदाहरणाद्वारे आपले जीवन विद्यार्थ्यांने घडवावे, असे आपल्या मनोगताद्वारे व्यक्त केले.

ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन प्रत्येक व्यक्तीने वंचीत, निराधार, दुर्बल व गरीबांना आपापल्या कुवतीप्रमाणे मदतीचा हात देऊन समाजाचे देणे पुर्ण करावे, हा विचार व्यक्त केला.

सचिव शोभा पाटोळे यांनी विचार व्यक्त करतांना असे सांगितले की, दुर्बल, वंचीत, गरजू विद्यार्थ्यांचे भविष्य यशस्वीरित्या घडवण्यासाठी संस्था सतत प्रयत्नशील असते.

संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांनी प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल यांचा शॉल, रोपटे व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. स्मिता अगरवाल व उषा मेनन यांचा सत्कार सचिव शोभा पाटोळे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे शिक्षक सुभाष भारूड यांनी केले.

विद्यार्थी प्रसाद शेलार याने प्रमुख पाहुणे सुदीप अगरवाल, सौ. स्मिता अगरवाल व उषा मेनन यांचे आभार मानले. जोसेफ पाटोळे यांनी पाहुणे व शाळेचे आभार मानले.

# नागापूर जैन धर्मस्थानकाचा लोकार्पण सोहळा उत्साहात

नगर – श्री सकल जैन श्रावक संघ, आदर्शनगर–नागापूर यांच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या जैन धर्मस्थानकाचा लोकार्पण सोहळा भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

आचार्य सम्राट राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., सरल स्वभावी दिव्यदर्शनजी म.सा. आणि संस्कारदाता सिद्धार्थमुनीजी म.सा. यांच्या प्रेरणेने उभारण्यात आलेल्या या धर्मस्थानकाचे लोकार्पण अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. (आदी ठाणा–२) यांच्या पावन सान्निध्यात झाले.

यावेळी महापौर सौ. ज्योतीताई गाडे, समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा, श्री नागापूर जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अशोक भंडारी, राजेश भंडारी, ईश्वर बोरा, नवनाथ कातोरे, डॉ. सागर बोरूडे, बाबासाहेब नागरगोजे, पुष्कर कुलकर्णी, हनुमान कातोरे, सतीश सुराणा (पुणे), उद्योजक राहुल जैन यांच्यासह भाविक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सासू मंडळ, बहू मंडळ व कन्या मंडळाने स्वागतगीत व भक्तिरसपूर्ण स्तवनांचे सादरीकरण केले.

प्रास्ताविकात अध्यक्ष अशोक भंडारी यांनी धर्मस्थानक उभारणीचा प्रवास, समाजबांधवांचे सहकार्य आणि या वास्तूचे धार्मिक व सामाजिक महत्त्व अधोरेखित करत सर्व दानदाते व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

धर्मस्थानकासाठी मौल्यवान जागेचे भूमिदान करणाऱ्या स्व. जवाहरलाल तथा रविलाल राहुल रूपेश रोहित गुगळे परिवाराच्या उदात्त योगदानाचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच स्थानक उभारणीसाठी भरीव आर्थिक योगदान दिल्याबद्दल उद्योजक व महावीर समूहाचे राजेश भंडारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याचप्रमाणे अशोक बोरा आणि आनंदतीर्थचे संस्थापक अध्यक्ष सतीश सुराणा (पुणे) यांचाही धार्मिक व सामाजिक योगदानाबद्दल शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



श्री सकल जैन श्रावक संघ, आदर्शनगर–नागापूर यांच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या जैन धर्मस्थानकाचा लोकार्पण सोहळा भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

गौतम डागा व लता कटारिया यांनी मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. सावेडी जैन संघाचे अध्यक्ष संदीप गांधी यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांनी आपल्या आशीर्वचनात सांगितले की, धर्मस्थानक ही केवळ दगड–विटांची वास्तू नसून आत्मजागृती, साधना आणि संस्कारांचे पवित्र केंद्र आहे. या स्थानकातून धर्मआराधनेची अखंड ज्योत प्रज्वलित राहो आणि प्रत्येक जीवाच्या आत्मकल्याणाचा मार्ग प्रशस्त होवो अशी मंगलकामना करत त्यांनी मंगल पाठ दिले.

समारोपप्रसंगी अशोक बोरा यांनी समर्पण चातुर्मास–२०२६ हा समाजाच्या श्रद्धा, संस्कार व एकात्मतेचा ऐतिहासिक महोत्सव ठरणार असून प्रत्येक समाजबांधवाने तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी एक ही नारा – चातुर्मास हमारा! अशी घोषणा देत उपस्थितांकडून तिची उत्स्फूर्त पुनरावृत्ती करून घेतली. प्रत्येक समाजबांधव हा समर्पण चातुर्मासाचा यजमान आहे, असे सांगत त्यांनी प्रत्येक घरातून या महाआयोजनात सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या आवाहनाला उपस्थितांनी हर्ष हर्ष – जय जय च्या जयघोषाने प्रतिसाद दिला.

कार्यक्रमानंतर सर्वांनी गौतम प्रसादीचा लाभ घेतला. नागापूर परिसरात उभारण्यात आलेले हे धर्मस्थानक भविष्यात धर्मप्रभावना, संस्कार संवर्धन आणि समाजसंघटनाचे प्रभावी केंद्र ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## आषाढी वारी मार्गावर महाअन्नदान सेवेत सहभागी व्हावे : ह.भ.प. मिलिंद चवंडके

नगर – आषाढी एकादशीच्या पायी वारी सोहळ्यासाठी पंढरपूरला जाण्याकरिता निघालेल्या दिंड्या आणि वारकऱ्यांना महाअन्नदान करण्याच्या सेवेत सहभागी व्हा, असे आवाहन हभप मिलिंद चवंडके यांनी केले आहे.



महाअन्नदान सेवेचे हे २१ वे वर्ष आहे. नगर शहरामधून मार्गस्थ होणाऱ्या छोट्या दिंड्यांमधील वारकरी बंधू–भगिनींना भोजनासाठी साहित्य पुरविण्याची सेवा हभप मिलिंद चवंडके गेल्या २० वर्षांपासून करत आले आहेत. या महाअन्नदान सेवेत शहरातील भाविकांना सहभागी करून घेणारा हा उपक्रम प्रतीवर्षी भाविकांच्या आणि पंढरपूरकडे चालत असलेल्या वारकऱ्यांचा कौतुकाचा विषय असतो.

आषाढी वारीच्या महाअन्नदान सेवेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शहरातील भाविकांनी आपल्या इच्छेनुसार साखर, गूळ, चहापत्ती, दूध, शेंगदाणे, साबुदाणा, भगर, तांदूळ, गव्हाचे पीठ, बेसन पीठ, तूरडाळ, मुगडाळ, भाजीचे मसाले, शेंगदाणा तेल, बटाटा वेफर्स, राजगिरा लाडू, राजगिरा पट्टी, रवा, पोहे, अंगाचे आणि कपड्यांचे साबण असे अत्यावश्यक साहित्य स्वयंस्फूर्तीने ९४२२४९५२८९ या भ्रमणध्वनीवर संपर्क करून पोहोच करावे, असे आवाहन हभप मिलिंद चवंडके यांनी प्रती वर्षाप्रमाणे केले आहे.



पंढरपूर आषाढी वारी २०२६ निमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेवा शिबिर व चरणसेवा उपक्रमासाठी कार्यरत स्वयंसेवक डॉक्टर व रुग्णमित्रांना टी–शर्ट व टोपींचे वितरण निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते करण्यात आले.

## आषाढी वारीतील आरोग्य सेवा शिबिरासाठी स्वयंसेवकांना टी–शर्ट आणि टोप्यांचे वितरण

नगर – पंढरपूर आषाढी वारी २०२६ निमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेवा शिबिर व चरणसेवा उपक्रमासाठी कार्यरत स्वयंसेवक डॉक्टर व रुग्णमित्रांना टी–शर्ट व टोपींचे वितरण निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते करण्यात आले. या साहित्याचे वितरण संबंधित रुग्णालय व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना करण्यात आले.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना आरोग्य सेवा, प्रथमोपचार व चरणसेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वयंसेवकांची ओळख सहज व्हावी तसेच सेवाकार्य अधिक सुसूत्रपणे पार पडावे, या उद्देशाने टी–शर्ट व टोपींचे वितरण करण्यात आले.

यावेळी तहसीलदार श्रीमती शोभा पुजारी, माहिती अधिकारी अमोल महाजन, सहाय्यक महसूल अधिकारी स्वप्नील फलटणे, महसूल सहाय्यक साईनाथ उप्पोड, संतोष साळवे, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, विळदघाट येथील श्रीमती काळे, डॉ. रेहान शाह तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, अहिल्यानगरचे स्वप्नील कच्छवे आदी उपस्थित होते.

# केडगाव होणार ‘प्रतिपंढरपूर’

नगर – केडगाव देवी परिसरातील धनश्री कॉलनी–चिपाडे मळा येथे संत सावता महाराज तसेच श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात उत्साहात पार पडला. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थित राहून भाविकांना शुभेच्छा दिल्या. परिसरातील नागरिकांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय बनला होता.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, विठ्ठल–रुक्मिणी मंदिर म्हणजे श्रद्धा, संस्कार आणि समाज एकत्र आणणारे केंद्र आहे. या मंदिरामुळे केडगाव परिसराला नवी आध्यात्मिक ओळख मिळाली असून भविष्यात हा भाग ‘प्रति पंढरपूर’ म्हणून ओळखला जाईल. नागरिकांनी एकोप्याने उभारलेले हे मंदिर समाजातील ऐक्य आणि भक्तीचे प्रतीक आहे. धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांना माझे कायम सहकार्य राहील. मंदिर परिसराचा विकास, भाविकांसाठी आवश्यक सुविधा आणि परिसरातील विकासकामांसाठीही आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.





केडगाव देवी परिसरातील धनश्री कॉलनी–चिपाडे मळा येथे संत सावता महाराज तसेच श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात उत्साहात पार पडला. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थित राहून भाविकांना शुभेच्छा दिल्या.

### विठ्ठल–रुक्मिणी मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात

नगरसेविका अश्विनी लोंढे म्हणाल्या की, केडगाव देवी मंदिर ते चिपाडे मळा भव्य दिंडी, पालखी मिरवणूक काढून भजन–कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांसह, युवक–युवती, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनीही उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला. धार्मिक सोहळ्याने जीवनात ऊर्जा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरात मुर्तींची स्थापना हा ऐतिहासिक क्षण आहे. या भागात विठ्ठल–रुक्मिणीचे मंदिर नसल्याची खंत आज दूर झाली आहे. परिसरातील नागरिकांनी स्वखर्चातून हे सुंदर मंदिर उभारले आहे. हा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असून नागरिकांचे त्यांनी अभिनंदन केले.

सोहळ्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. २५ जुलै रोजी मंदिरात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी नगरसेवक मयूर बांगरे, उद्योजक सुमित लोंढे, उद्योजक जालिंदर कोतकर, संभाजी पवार, विजय सूंबे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आरोग्य सेवेचा दिलासा

नगर – आषाढी वारीतील वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांतर्गत प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणीच्या वतीने राजुरी (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे चरणसेवा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.





आषाढी वारीतील वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर, सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमांतर्गत प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणीच्या वतीने राजुरी (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथे चरणसेवा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

७ जुलै रोजी श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे राजुरी येथे आगमन झाले. यावेळी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास केलेल्या वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी आयुर्वेदिक औषधी तेलाच्या साहाय्याने चरणसेवा करण्यात आली. पायांना औषधी तेलाने मसाज केल्यामुळे दीर्घ पायी प्रवासामुळे आलेला ताण आणि थकवा कमी होण्यास मदत झाली तसेच पुढील प्रवासासाठी वारकऱ्यांना नवउत्साह मिळाला.

चरणसेवेसोबतच वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. आवश्यक औषधांचे मोफत वाटप, प्रथमोपचार सेवा तसेच विविध आरोग्यविषयक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सर्व वारकऱ्यांना आपुलकीने, तत्परतेने आणि समर्पित भावनेने चरणसेवा व आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

चरणसेवा या सेवाभावी उपक्रमामुळे पुढील प्रवासाला मोठा आधार मिळाल्याची भावना वारकऱ्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष तसेच प्रवरा मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रवरा मेडिकल कॉलेजचे अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेसाठी १० जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करा

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिका, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६–२७ या वर्षासाठी सुब्रतो मुखर्जी आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा (सब–ज्युनियर व ज्युनियर) ग्रामीण जिल्हास्तरीय तसेच महानगरपालिका स्तरावर आयोजित करण्यात येत असून, पात्र शाळा, महाविद्यालयांनी आपल्या संघांची १० जुलैपर्यंत ऑनलाइन नोंदणी करून अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळांनी www.subrotocup.in/register या संकेतस्थळावर संघनोंदणी करणे आवश्यक असून, १५ वर्षांखालील खेळाडूंनी अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) मान्यताप्राप्त Selection Maturity Age Determination Test (SMADT) पूर्ण केलेली असावी. शाळांनी संघनोंदणी अर्ज व आवश्यक कागदपत्रे रहळश्रूरपरसरीवेऽ सारळश्र.लो या ई–मेलवर पाठवावीत. अर्जाची छायाप्रत संबंधित शाळेत जतन करून ठेवावी. स्पर्धेसाठी १५ वर्षांखालील (सब–ज्युनियर) मुलांचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा, तर १७ वर्षांखालील (ज्युनियर) मुला–मुलींचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी सचिन राजपूत, क्रीडा मार्गदर्शक, जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर मो. ८०८७०७६६३३ / ८३६९५३९०७७ अथवा विल्सन फिलिप्स, मनपा क्रीडा अधिकारी मो. ९४२०७९६१४० यांच्याशी संपर्क साधावा.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगरतर्फे सेवाव्रती डॉक्टरांचा विशेष सन्मान

नगर – नगर शहरात ७९ वर्षापूर्वी, १८ ऑगस्ट १९४७ रोजी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगर तर्फे १ जुलै हा दिवस 'डॉक्टर्स डे' म्हणून 'अहमदनगर होमिओपॅथिक महाविद्यालय व हॉस्पिटल' व 'जनकल्याण रक्तकेंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर होमिओपॅथिक महाविद्यालयात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थांच्या भरगच्च उपस्थितीत साजऱ्या झालेल्या ह्या विशेष सन्मान सोहळ्यात डॉक्टरांनी त्यांनी आजवर केलेल्या व करीत असलेल्या ‘निरपेक्ष रुग्णसेवा’ करणे कशी व का महत्त्वाची आहे? याचे भावी डॉक्टरांसमोर सोदाहरण विवेचन केले आणि केवळ कॉर्पोरेट हॉस्पिटल संस्कृतीची भलामण न करता आजही वैद्यकीय व्यवसायामध्ये व देशासाठी फॅमिली डॉक्टर ही संकल्पना कशी महत्वाची आहे हे स्वतःची उदाहरणे सांगून स्पष्ट केले.

१ जुलै हा दिवस रोटरी परिवारात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. ह्या दिवशी रोटरीच्या नवीन वर्षाची सुरुवात होत असते आणि रोटरीच्या नियमा प्रमाणे या एकाच दिवशी जगभरातील २२१ देशां मधील ४६ हजार रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष व सचिव आपला कार्यभार स्वीकारतात. सन २०२६–२७ करिता रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष म्हणून इंजि. रो. सुहास क्षीरसागर आणि सचिव म्हणून रो.संदीप ठोंबे यांनी १ जुलै रोजी पदभार स्वीकारला आणि नगरमधील सेवाव्रती डॉक्टरांचा यथोचित गौरव करून आपल्या रोटरी वर्षाचा श्रीगणेशा केला.

नगर शहराच्या सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर रवींद्र साताळरकर ह्यांच्या हस्ते व अध्यक्षेखाली ‘सन्मान पत्र’ अर्पण करून डॉ.हेमंत नाईक, डॉ.संदीप फिरोदिया, डॉ. दिलीप धनेश्वर, डॉ.प्रशांत यवतकर, डॉ. जॉन उजागरे, डॉ.खालिद शेख, डॉ.प्रवीण बोठे, डॉ.इक्राम खान, डॉ.प्रशांत सूरकुटला, डॉ. गुलशन गुप्ता, डॉ.ललित राम जोशी या सेवाव्रती डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. तसेच अमेरिका स्थित जागतिक रँकिंग प्लॅटफॉर्म Expertscape USA च्या मानाच्या यादीत जगातील पहिल्या ५० नेत्र तज्ञात नगरचे डॉ.वर्धमान कांकरिया यांचा समावेश झाल्याने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. डॉ.सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, जनकल्याण रक्त केंद्राचे डॉ.मढीकर तसेच अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ.भूषण अनभुले, डॉ. सोनवणे व प्राचार्य डॉ.रवींद्र पवार यांचा आणि अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये कार्यरत डॉक्टर्स व अध्यापक डॉक्टर्स यांचा सन्मान पत्र अर्पण करून सत्कार करण्यात आला.



‘डॉक्टर्स डे’ साजरा करण्या मागची संकल्पना स्पष्ट करताना रोटरीचे अध्यक्ष रो. सुहास क्षीरसागर, सचिव रो.संदीप ठोंबे व प्रोजेक्ट चेअरमन इंजि.रो. राजेश उपाध्ये यांनी सांगितले की या वर्षी रोटरी सन्माना करीता अशा डॉक्टरांची निवड करण्यात आली आहे की ज्या डॉक्टरांकडे कुठलंही सुसज्ज हॉस्पिटल नाही, कुठलेही ओटी (ऑपरेशन थिएटर) नाही किंवा त्यांची स्वतःची क्लिनिक आधुनिक पद्धतीने सजविलेली नाही. तरी हे डॉक्टर्स कमीतकमी गेल्या २०/२५ वर्षापासून तन मन धनाने उत्कृष्ट रुग्णसेवा व समाजसेवा निरपेक्ष भावनेने करीत आहेत. ह्या सर्व डॉक्टरांना कोणी फी देओ या न देवो ते कधी फी साठी अडून बसले नाहीत. ‘आधी औषधोपचार मग फीचा विचार’ हे डॉक्टरांचं तत्व. किंबहुना पैसे कमावण्यासाठी ह्या डॉक्टरांनी सलग २०/२५ वर्षा पासून प्रॅक्टिसच केली नाही. फक्त आणि फक्त समाजसेवा रुग्णसेवाच करावयाची आहे हे व्रत निर्धाराने पत्करून सर्वजण डॉक्टरी पेशा करीत आहेत. फक्त रुग्णालाच नव्हे तर पर्यायाने अशा अनेक कुटुंबाला या सर्वांनी आधार दिलेला आहे. आणि म्हणून समाजाच्या रंगमंचावर ‘बिहाइंड द कर्टन्स’, अविरहितपणे उत्तम, निरोगी, सचोटीने समाजसेवा, रुग्णसेवा करणाऱ्या अशा या देवदूत डॉक्टरांचा यथोचित सन्मान व्हावा आणि या सेवाव्रती डॉक्टरांचे सत्कार्य सर्व नगरकरांना माहित व्हावे या उद्देशाने डॉक्टर्स डेचे औचित्य साधून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. सन्मानार्थी डॉक्टरांची निवड करताना रोटरीने डॉक्टर कोणत्या पॅथीचे आहेत, त्यांची डिग्री कोणती आहे असा कोणताही अॅकॅडेमिक निकष न लावता केवळ आणि केवळ त्यांच्या सेवाभावी सचोटीच्या वृत्तीलाच प्राधान्य दिलेले आहे. रोटरीच्या टीमने रुग्णांच्या माहितीच्या आधारे तसेच गुणविशेष लावून आणि ग्राउंड सर्व्हे करून डॉक्टरांची यथोचित निवड केली आहे.

डॉ.रवींद्र साताळकर म्हणाले की जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त फक्त एकच असा विशिष्ट दिवस डॉक्टर्स डे म्हणून युनायटेड नेशन्स द्वारे घोषित केलेला नाही. डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी जगभरात अनेक कार्यक्रम विविध दिवशी साजरे केले जातात. परंतु आपल्या देशात भारत सरकारने १ जुलै हा दिवस डॉक्टर्स डे म्हणून घोषित केलेला आहे. या दिवशी डॉक्टर बिधान चंद्र रॉय जे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री देखील होते आणि मुख्यत: सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरव केलेला आहे आणि अशा या डॉक्टरांच्या जन्मदिनाचे निमित्त साधून १ जुलै हा राष्ट्रीय डॉक्टर दिवस म्हणून भारतभर साजरा केला जातो.

इंजि.रो.सुहास क्षीरसागर म्हणाले की डॉक्टर ज्यांच्या हस्ते आपला सन्मान स्वीकारणार आहेत ते डॉक्टर रवींद्र साताळकर आपल्या शहराचे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व आहे. नगरमध्ये पहिल्या पिढीचे सर्जनशील डॉक्टर म्हणून संपूर्ण शहराला डॉक्टर साताळकर परिचित आहेत. आजपर्यंत डॉक्टरांनी विविध मार्गाने समाजाची सेवा केलेली आहे. डॉक्टर साताळकरांनी देखील आपल्या उमेदवारीच्या काळात अत्यल्प फी मध्ये निरपेक्षपणे रुग्णसेवा केलेली आहे. डॉक्टर नगरच्या जनकल्याण रक्तपेढीचे संस्थापक अध्यक्ष आहेत. इतकेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष म्हणून काम पाहत असताना त्यांनी रक्तपेढीचे महाराष्ट्रभर जाळे विणलेले आहे. आजही अत्यल्प फी मध्ये डॉक्टर आधुनिक सुसज्ज अशा साताळकर लोटस हॉस्पिटलमध्ये रूग्णसेवा आणि समाजसेवा करीत आहेत. रोटरी साठी अभिमानाची बाब म्हणजे डॉक्टर साताळकर हे गेल्या ४० वर्षापासून रोटेरियन आहेत आणि आमच्या क्लबचे पास्ट प्रेसिडेंट असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबची वाटचाल चालू आहे. आज त्यांना सन्मान पत्र अर्पण करून सत्कार करताना रोटरीला मनापासून आनंद होत आहे. तसेच कार्यक्रमात शेतकरी दिना निमित्त महाराष्ट्र शासनाचे विविध पुरस्कार मिळविणारे कृषी भूषण शेतकरी विष्णू रामचंद्र जरे यांचा सन्मान पत्र अर्पण करून सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन कम्युनिटी सर्व्हीसचे प्रोजेक्ट चेअरमन इंजि.रो.राजेश उपाध्ये यांनी केले. कार्यक्रमास रोटरीन दीपक गुजराथी, दादासाहेब करंजुले, निलेश वैकर, दिलीप कर्नावट, रवींद्र राऊत, अनघा राऊत, पुरुषोत्तम जाधव, नेहा जाधव, माधव देशमुख, सुधा कांकरिया, प्रकाश कांकरिया, सुभाष गर्जे, रवींद्र थाडे, प्रशांत बोगावत उपस्थित होते. रो.पुरुषोत्तम जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर रक्तदान व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर पार पडले. कार्यक्रमास जनकल्याण रक्त केंद्र व डॉ.मढीकर यांचे सहकार्य लाभले.

# कॅलिडोस्कोप

# इयरपॉड वापरताय, सावधान!


लोकल रेल्वेत प्रवास करताना आज सर्वजण कानाला इयर पॉड, इयर फोन्स लाऊन मोबाईलवरील मनोरंजन ऐकत आणि बघत असतात; पण या श्रवण यंत्रांचा अतिवापर धोकादायक ठरू शकतो. अती वापर आणि अती आवाज तुम्हाला बहिरा करू शकतो.

सार्वजनिक ठिकाणी कुठेही बघा, आज दहा पैकी नऊजणांनी कानाला इअर फोन्स किंवा इअरपॉड लावले असल्याचे दिसून येते. स्मार्टफोनच्या या युगात इअरफोन्स, इअरबड्स आणि इअर पॉड हे दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मोबाईलवर बोलण्यासाठी, गाणी ऐकण्यासाठी, ऑनलाइन बैठका, चित्रपट आणि 'सोशल मीडिया'साठी लाखो लोक दररोज अनेक तास इअर पॉडचा वापर करत आहेत. अतिआवाजात हे श्रवण यंत्र वापरून ऐकण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होत आहे. तरुण वयातच बहिरेपणाचा येण्याची शक्यता अधिक असल्याचा इशारा कान-नाक-घसा तज्ज्ञांनी दिला आहे.

डॉक्टरांच्या मते, सतत मोठ्या आवाजात आणि दीर्घकाळ इअर पॉड वापरल्यामुळे कानातील अतिसूक्ष्म पेशींवर ताण येतो. या पेशी एकदा खराब झाल्यानंतर पुन्हा नव्याने तयार होत नाहीत. परिणामी सुरुवातीला कानात आवाज येणे, संभाषण नीट ऐकू न येणे, डोकेदुखी, चक्कर येणे आणि नंतर कायमस्वरूपी श्रवणशक्ती कमी होण्यास सुरुवात होते, असे तज्ज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे.

तरुणांसह लाखो आबालवृध्द दिवसातून ५ ते ८ तास इअर पॉड वापरत आहेत. कामाच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान आणि घरीही कानात सतत इअरबड्स असल्याने कानांना विश्रांती मिळत नाही. रेल्वे, बस, विमानतळ किंवा गर्दीच्या ठिकाणी बाहेरील आवाज दाबण्यासाठी अनेकजण मोबाईलचा आवाज अधिक वाढवतात. ही सवय सर्वाधिक घातक ठरत आहे. कमी आवाजात ऐकल्यास बहिरेपणा येण्याची शक्यता कमी आहे; पण हा आवाज जास्त झाला की बहिरेपणाची शक्यता अनेक पटीने वाढते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते ८५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज दीर्घकाळ ऐकल्यास श्रवणशक्तीवर परिणाम होऊ शकतो. अनेक आधुनिक इअर पॉड १०० ते ११० डेसिबलपर्यंत आवाज निर्माण करू शकतात. त्यामुळे कानातील नसांवर आणि श्रवण यंत्रणेवर परिणाम होण्याचा धोका वाढतो. यामुळे अनेक ईएनटी (नाक, कान, घसा) डॉक्टरांकडे कानाच्या समस्या घेऊन येणाऱ्या तरुणांची संख्या वाढू लागली आहे.





# साप जीभेने घेतो वास

साप जेव्हा जीभ बाहेर काढतो, तेव्हा हवेत असलेले अतिसूक्ष्म कण त्याच्या जीभेला चिकटतात. त्यानंतर तो जीभ पुन्हा तोंडात घेतो. हे कण तोंडाच्या वरच्या भागातील एका विशेष अवयवापर्यंत पोहोचतात. या अवयवाला वैज्ञानिक भाषेत 'जेकब्सन ऑर्गन' किंवा 'व्होमेरोनाझल ऑर्गन' असे म्हणतात. हा अवयव त्या कणांचे विश्लेषण करून मेंदूकडे संदेश पाठवतो. यामुळे सापाला त्याच्या आसपास शिकार आहे का, एखादा शत्रू आहे का किंवा कोणता अडथळा आहे का, याची माहिती मिळते.

सापाची जीभ ही दोन भागांमध्ये विभागलेली असते. याला 'फोर्क्ड टंग' म्हणतात. माणसाला दोन कान असल्यामुळे आवाज कोणत्या दिशेने येतो हे समजते, त्याचप्रमाणे सापाच्या दोन टोकांच्या जीभेमुळे वास किंवा धोका कोणत्या दिशेने आहे हे त्याला कळते. सापाच्या जीभेच्या उजव्या भागावर जास्त कण चिकटले तर सापाला समजते, की शिकार किंवा वास उजव्या बाजूला आहे. त्यामुळे तो अचूक दिशा ठरवू शकतो. यामुळेच साप सतत जीभ आत बाहेर करत असतो.

सापाच्या जीभेबाबत बोलायचे झाल्यास साप आपल्या जीभेने वास घेण्याचे काम करतो. कारण माणसांप्रमाणे हवेतले वास ओळखण्यासाठी त्याच्याकडे प्रभावी नाक नसते. सापाने जीभ बाहेर काढणे थांबवले, तर त्याला आसपासच्या वातावरणाची माहिती मिळणार नाही. त्याला रस्ता सापडणार नाही, शिकार शोधता येणार नाही आणि धोका ओळखणेही अशक्य होईल. त्यामुळेच साप आपली जीभ सतत आत-बाहेर करताना पाहायला मिळतो.

# दहा मजले खाली मेट्रो स्टेशन

जमिनीच्या आत १० मजली इमारती इतकं खोल रेल्वे स्टेशन महाराष्ट्रात उभारले जात आहे. भारतातील सर्वात मोठे अंडर ग्राऊंड रेल्वे स्टेशन बुलेट ट्रेनसाठी बांधले जात आहे. याआधीच देशात नदीच्या खाली १० मजली इमारती इतकं खोल मेट्रो स्टेशन बांधण्यात आले आहे. हे भारतातील सर्वात मोठे अंडर ग्राऊंड मेट्रो स्टेशन आहे. नदीच्या खाली १० मजली इमारती इतकं खोल जाऊन मेट्रो ट्रेन पकडावी लागते.

भारतातील सर्वात मोठे अंडर ग्राऊंड मेट्रो स्टेशन विज्ञान आणि अभियांत्रिकीचा एक अद्भुत नमुना आहे. कोलकाताचे हावडा मेट्रो स्टेशन हे देशातच नाही, तर जगभरात कुतूहलाचा विषय ठरले आहे. हे स्टेशन जमिनीवर नसून, नदीच्या पोटात आहे. त्याची खोली १० मजली इमारती इतकी आहे. एका खळाळत्या, उसळत्या नदीच्या खाली हे स्टेशन बांधले आहे. देशातील पहिला पाण्याखालचा मेट्रो बोगदा कोलकाताच्या हुगळी नदीच्या पोटात बांधण्यात आला आहे. प्रवासी या स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उतरतात तेव्हा अचानक एका रहस्यमयी जगात प्रवेश केल्याचा भास होतो. मेट्रो ट्रेन नदीखालच्या या अत्याधुनिक बोगद्यातून पूर्ण वेगाने प्रवास करते, तेव्हा हा रोमांचक पाण्याखालचा प्रवास फक्त ४५ सेकंदांचा असतो.

हावडा मेट्रो स्टेशन जमिनीच्या पातळीपासून सुमारे ३३ मीटर म्हणजेच १०८ फूट खाली आहे. हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पूर्ण करणे ही कोलकाता मेट्रो रेल कॉर्पोरेशनसाठी (केएमआरसी) एक अग्निपरीक्षाच होती. मेट्रो स्थानके सहसा इतक्या खोलवर बांधली जात नाहीत; परंतु हुगळी नदीखालून सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्यासाठी आणि जुन्या शहरातील ऐतिहासिक इमारतींचे जतन करण्यासाठी अभियंत्यांना इतक्या खोलवर उतरणे भाग पडले. हावडा परिसर भारतातील सर्वात व्यस्त रेल्वे स्थानकांपैकी एक म ानला जातो. हा परिसर दाट लोकवस्ती, शतकानुशतके जुन्या, नाजूक इमारती आणि भूमिगत पाइपलाइनच्या विशाल जाळ्याने वेढलेला होता. हुगळी नदीच्या ओल्या आणि सहज कोसळणाऱ्या वाळूच्या जमिनीखाली खोदकाम करणे जीवघेणे होते. स्टेशनचे काम पाण्याच्या प्रचंड दाबात आणि भूस्खलनाच्या मोठ्या धोक्यामध्ये पार पडले. या स्टेशनमध्ये प्रवेश करताच त्याच्या भव्यतेची आणि आश्चर्यकारक खोलीची खरी जाणीव होते. येथे बसवलेले एस्कलेटर संपूर्ण देशातील सर्वात लांब आणि सर्वात मोठे आहेत.



कोलकाता आणि हावडा ही जुळी शहरे आहेत, जी अनेक वर्षे केवळ हावडा ब्रिज आणि फ `री सेवांवर अवलंबून होती.

येथे वाहतूक कोंडी आणि भीषण वाहतूक ठप्प होणे ही एक मोठी समस्या होती.



# जादा काम केल्याची शिक्षा!

दोन-तीन दिवस ऑफिसमधून १०-१५ मिनिटे लवकर निघून बघा. मग तुम्हाला दिसेलच. कोणीतरी तुम्हाला नक्कीच मध्येच थांबवून विचारेल, 'भाऊ, तुम्ही इतक्या लवकर का निघता?' तुम्ही एक आठवडा, दोन आठवडे किंवा अगदी महिनाभर जास्त ऑफिसमध्ये काम केले, किंवा सुट्ट्यांमध्ये एखादे काम पूर्ण केले, तर तुम्हाला सर्वात सक्षम कर्मचारी मानले जाईल. भारतात, अनेक कार्यालयांमध्येसुद्धा, 'जास्तीचे काम' करणे किंवा आजारी असताना काम करणे याला समर्पण मानले जाते.

असे म्हटले जाते की, ही व्यक्ती आपल्या कामाप्रती अविश्वसनीयपणे समर्पित आहे; परंतु काही देशांमध्ये कामाची संस्कृती खूप वेगळी किंवा अगदी उलट असते. तिथे तुमची रजा रद्द करून काम केल्याबद्दल तुम्हाला फटकारले जाऊ शकते. कोणी म्हणेल, की इतके जास्त काम करून तुम्ही तुमच्या कनिष्ठांना काय शिकवणार आहात. एका व्यक्तीने 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर अशीच एक गोष्ट शेअर केली आहे. त्याने सांगितले, की तो कामासाठी नॉर्वेला गेला होता. तेव्हा त्याने भारतात वापरलेल्या त्याच पद्धतींचा अवलंब केला. त्याला वाटले, की तिथे कठोर परिश्रम केल्यास त्याचे कौतुक होईल; पण झाले मात्र नेमके उलट. विनोद नावाच्या या युजरने लिहिले, की मी १५ वर्षांपूर्वी नॉर्वेला राहायला गेलो. सोबत भारतीय कार्यसंस्कृतीही घेऊन गेलो. आठवड्याच्या शेवटी काम करणे, दुपारच्या जेवणाची सुट्टी टाळणे, रात्री उशिरापर्यंत काम करणे, तब्येत बरी नसतानाही स्वतःला कामासाठी झोकून देणे, हे सर्व केले. मग एके दिवशी, नॉर्वेमधील माझ्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये माझ्या बॉसने मला फोन केला.

मला वाटलं होतं, की तो माझी प्रशंसा करेल. पण तो म्हणाला, तू मला न सांगता एक प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी शनिवारी माझ्या ईमेलला उत्तर दिलंस आणि तुझी सुट्टी रद्द केलीस? विनोदच्या बॉसने त्याला सुट्टी रद्द करण्याबद्दल प्रश्न विचारला. विचारले की यातून त्याचे कनिष्ठ काय शिकतील. बॉस म्हणाला, मला माहित आहे की तुझा हेतू चांगला होता; पण हे बरोबर नाही. सुट्टी घेणे महत्त्वाचे आहे. ती कधीही चुकवू नकोस. तुझे कनिष्ठ तुझ्यावर लक्ष ठेवून आहेत. त्यांनी हे पाहिले, तर त्यांना वाटेल की समर्पण म्हणजे हेच.

त्याने पुढे लिहिले, की मला ओरडा मिळाला. खूप जास्त काम केल्याबद्दल. मी गोंधळून तिथे बसून राहिलो. भारतात यासाठी मला कदाचित 'अति समर्पित' म्हटले गेले असते. इथे मात्र ही एक समस्या होती. त्या दिवशी माझ्या आत काहीतरी तुटले. त्यामुळे मला ती धावपळ, ती अस्वस्थता, सतत काम करत राहण्याची गरज समजून घेण्यास भाग पडले. ज्या गोष्टी मी नकळत गमावल्या होत्या, त्यांचा विचार करून मी पहिल्यांदाच रडलो. ती पोस्ट अनेकांना भावली; पण त्यामुळे सोशल मीडियावर कार्यसंस्कृतीबद्दल एक चर्चाही सुरू झाली.




# उत्सव जुळ्या मुलांचा

नायजेरियामध्ये 'इग्बो ओरा' नावाचं शहर आहे. या शहराला जुळ्या मुलांची राजधानी असं म्हटलं जातं. कारण जगातली सर्वाधिक जुळी मुलं इथेच जन्माला येतात. म्हणूनच इथे जुळ्यांच्या उत्सवाचं आयोजन केलं जातं. या उत्सवात जगभरातली जुळी भावंडं सहभागी होतात. लहान बाळांपासून १०० वर्षांच्या आजीआजोबांपर्यंत विविध वयोगटातली भावंडं इथे पहायला मिळतात. एका अहवालानुसार अमेरिकेत प्रत्येकी हजार मुलांमागे ३३ जुळ्या मुलांचा जन्म होतो. मात्र इग्बो ओरामध्ये जन्म घेणाऱ्या एक हजार मुलांमधली ५० मुलं जुळी असतात. इग्बो ओरामध्ये जुळ्या मुलांच्या जन्माचं प्रमाण एवढं अधिक का आहे, याबाबत संशोधन सुरू असून याबाबत फारशी माहिती हाती आलेली नाही. इथल्या महिलांच्या आहारविहाराच्या सवयींमुळे जुळ्या मुलांचा जन्म होत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. मात्र शास्त्रज्ञांनी याबाबत शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे या भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर जुळी मुलं का जन्म घेतात, हे एक गूढच आहे.



# हेअर बँकेत जपून ठेवा केस

ब्लड बँकेबद्दल तर आपण जाणतोच. या ब्लड बँकेत लोकांनी दान केलेलं रक्त साठवून ठेवलं जातं. हे रक्त आवश्यकतेनुसार विविध रुग्णालयांमध्ये पुरवलं जातं. याच धर्तीवर मँचेस्टरमध्ये एक हेअर बँक सुरू करण्यात आली आहे. सध्या केस गळण्याचं प्रमाण वाढत चालल्यामुळे बऱ्याच लोकांना टक्कल पडतं. हे टक्कल पडल्यानंतर अनेक जण केशरोपण करून घेतात. या हेअर बँकेत आपण आपले केस फ्रीज करून ठेऊ शकतो. टक्कल पडू लागल्यावर हेच केस केशरोपणासाठी वापरता येऊ शकतात. केस फ्रीज करण्यासाठी भारतीय चलनात दोन लाख ३० हजार रुपये खर्च येईल. या हेअर बँकेमुळे पुरुषांना अधिक लाभ होणार आहे. पुरुषांमध्ये टक्कल पडण्याच्या समस्येत वाढ होत चालली आहे. या ब्लड बँकेमुळे टक्कल पडू लागल्यानंतर पुरुष मंडळी अगदी सहज केशरोपण करून घेऊ शकतील. ब्रिटनमध्ये जवळपास ६५ लाख पुरुषांना टक्कल पडलं आहे. हेअर बँकेतले केस उणे १८० अंश सेल्सियस तापमानात फ्रीज करून ठेवण्यात येणार आहेत. हेअर बँकेत केस फ्रीज करून मग त्यांचं केशरोपण करण्याचा खर्च प्रचंड असेल. मात्र हा अनोखा उपक्रम आहे, असंच म्हणावं लागेल.

# आजोबांना चढायचे बोहल्यावर!

सध्या 'सोशल मीडिया'वर ब्रिटनमधील एका वयोवृद्ध अब्जाधीशाची जोरदार चर्चा आहे. वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांना एक सुंदर, तरुण साथीदार हवा आहे. जगातील सर्व संपत्ती त्यांच्या पायाशी लोळण घेत आहे. पैसा, संपत्ती, मोठा महाल, अनेक व्यवसाय, आलिशान जीवन सर्व काही त्यांच्याकडे आहे; पण साथीदार नाही. लग्नासाठी त्यांनी एक खास अट ठेवली आहे. त्याची सध्या जगभर चर्चा सुरू आहे. या वयात अनेकांचे हातपाय थरथरतात. मनाने आणि शरीराने अनेक जण थकतात; पण सर बेंजामिन स्लेड हे त्याला अपवाद आहेत. त्यांचे मन अजूनही तरूण आहे.

सर बेंजामिन स्लेड हे ब्रिटनमधील एक मोठे प्रस्थ आहेत. ते सोन्याचा चमचा घेऊनच जन्माला आले. ते उद्योगपती आहेत. सॉमरसेट इथे त्यांचे अत्यंत जुने आणि भव्य मोनसेल हाऊस डौलात, दिमाखात उभे आहे. या भव्य महालात ५० भव्य खोल्या आहेत. मोठमोठ्या बागा, समृद्धी, ऐश्वर्य हात जोडून उभे आहेत; पण आता त्यांना या वयात एक चिंता सतत सतावत आहे. या वयात त्यांचा या विशाल साम्राज्याला वारस हवा आहे. त्यांना वाटते, की त्यांची होणारी बायको त्यांचा वारसदार देईल. त्यांनी हे सर्व सुख पत्नीच्या पायाशी असतील असे अभिवचन दिले आहे.

ब्रिटनच्या या अब्जाधीशाने पत्नीला काय काय ऑफर्स दिल्या त्याची यादीच वाचून दाखवली आहे. पत्नी या आलिशान महलाची राणी होईल. खर्चासाठी दरवर्षी मोजता येणार नाही इतका पैसा मिळेल. जगातील सर्वात महागड्या कार दिमतीला असतील. आलिशान आयुष्य ती जगेल. या सर्व संपत्तीवर तिचा समान हक्क असेल. सर बेंजामिन यांनी तरुण पत्नीसाठी शोधाशोध सुरु केली आहे. अनेक डेटिंग साईट्सवर त्यांनी प्रोफाईल अपडेट केले आहे.

स्थानिक वृत्तपत्रात मोठ्या जाहिराती दिल्या आहेत. टीव्हीवरही त्यांनी आपली इच्छा जाहीर केली आहे. 'सोशल मीडिया'वर त्यांच्या अकाऊंटवरून तरुण पत्नीसाठी जाहीर आवाहन केले आहे. अर्थात त्यांना अनेक तरुण मुलींकडून लग्नासाठीचे प्रस्ताव आले आहेत; पण त्यांची एक मोठी अट आहे. त्यांच्या मते, केवळ आलिशान जीवनाच्या आमिषाने आलेल्या तरुणीशी ते लग्न करणार नाहीत. ते तर तिला मिळणारच आहे; पण जी त्यांच्या उर्वरीत आयुष्यात त्यांच्यासोबत खऱ्या अर्थाने नाते निभावणारी असेल तिच्यासोबतच ते लग्न करणार आहेत.





# ड्रग्ज तस्करीत मांजर!

माणसाला या पृथ्वीवरील सर्वात स्वार्थी प्राणी म्हटले, तर त्यात काहीही चुकीचे नाही. कारण तो स्वतःच्या फायद्यासाठी कोणाचाही चुकीच्या गोष्टींचा वापर करू शकतो. कधीकधी माणूस स्वार्थात इतका आंधळा होतो, की तो प्राण्यांचा चुकीच्या पद्धतीने वापर करण्यासही मागेपुढे पाहत नाही. यासंदर्भातील एक घटना उघडकीस आली आहे.

*

तुरुंगात ड्रग्ज पुरवण्यासाठी मांजरींचा वापर केला जातो. मध्य अमेरिकेतून हे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. मध्य अमेरिकेतील कोस्टा रिका येथील तुरुंगात ड्रग्जची तस्करी करण्यासाठी मांजराचा वापर केला जात असे. तुरुंग प्रशासनाने एका मांजराला ड्रग्जचे पॅकेट बांधलेले असताना पकडले. ही घटना पाहिल्यानंतर तुरुंगातील कैद्यांनी खेळलेला खेळ आहे, असे वाटले; परंतु सत्य उघड झाले तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.

* **चौकशी सुरू**

मांजराला असे पाहिल्यानंतर लोकांनी चौकशी सुरू केली. हे एखाद्या संघटित तस्करी टोळीचे काम आहे का, यात तुरुंगातील कैदी आणि बाहेरील नेटवर्क गुंतलेले आहे का, याचा शोध पोलिस घेत आहेत. याशिवाय, या पॅडीज नेटवर्कमध्ये प्राण्यांचा वापर ड्रग्ज तस्करीसाठी करण्यात एखादा कैदी सामील आहे का, हेही शोधण्याचा पोलिस प्रयत्न करत आहेत.

# अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात गवांदे क्लासचे मोलाचे योगदान : महापौर ज्योतीताई गाडे

## बारावी बोर्ड, एमएचटी-सीईटी व जेईई परीक्षेतील दीडशे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

नगर – शिक्षण हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे भक्कम आधारस्तंभ असून गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावरच यशाची शिखरे गाठता येतात. अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात गवांदे क्लासने गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत यशस्वी पिढी घडविण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची अनेक दारे खुली करून देत स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले आहे. शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांचा वेध घेत आधुनिक पद्धतीने विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य गवांदे क्लासने केले असून त्यामुळेच गवांदे क्लासने यशाची परंपरा कायम राखली आहे. प्रा. प्रभाकर गवांदे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले विद्यार्थी राज्य, देश आणि जगभर नावलौकिक मिळवत यशाचे शिखर गाठत असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.



गवांदे क्लासच्या बारावी बोर्ड, एमएचटी-सीईटी आणि जेईई परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा झाला. (छायाचित्र – लहू दळवी)

गवांदे क्लासच्या बारावी बोर्ड, एमएचटी-सीईटी आणि जेईई परीक्षेतील दीडशे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात झाला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, गवांदे क्लासचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे, प्राचार्य डॉ. नितीन शेरजे, डॉ. डी. जी. भालके, डॉ. पुष्पराज वारके, छायाताई गवांदे, युवराज महांडुळे, मोनाली पवार, मेघा भास्कर, अभिजीत राठोड, सूरज जायभाय यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, गेल्या अठरा वर्षांपासून गवांदे क्लासची यशस्वी वाटचाल आपण जवळून पाहत आलो आहोत. दरवर्षी या क्लासमधील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे, तर सुसंस्कृत आणि जबाबदार विद्यार्थी घडविण्याचे कार्यही गवांदे क्लास सातत्याने करत आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी विश्वासार्ह आणि हक्काचे शैक्षणिक व्यासपीठ म्हणून गवांदे क्लासची ओळख निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

संचालक प्रा. प्रभाकर गवांदे यांनी संस्थेच्या यशस्वी निकालाची माहिती देताना सांगितले की, यावर्षी गणित विषयात आमच्या क्लासचे तीन विद्यार्थी राज्यात प्रथम आले असून २५ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत. एमएचटी-सीईटी परीक्षेत ३० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले असून जेईई परीक्षेत १५ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले आहेत. तसेच २८ विद्यार्थी आयआयटी प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमासोबतच पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# धोकादायक वीज यंत्रणा तातडीने दुरुस्त करा

## नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगरसेविका रुपाली दातरंगे यांचे महावितरणला निवेदन

नगर – विविध भागांमध्ये वाकलेले वीजखांब, तुटलेल्या व लोंबकळणाऱ्या वीजतारा, उघडे पडलेले डी. पी. (डिस्ट्रिब्यूशन पॉइंट) तसेच वारंवार होणाऱ्या स्पार्किंगमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी नगरसेविका सौ. रुपाली दातरंगे यांनी संबंधित लोकप्रतिनिधींसह महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना निवेदन देऊन तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. दिल्लीगेट येथील महावितरण कार्यालयात हे निवेदन सादर करण्यात आले असून संपूर्ण प्रभागाची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.



धोकादायक वीज यंत्रणा तातडीने दुरुस्त करा; नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगरसेविका रुपाली दातरंगे यांनी महावितरणला निवेदन दिले. याप्रसंगी संदीप दातरंगे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, शुभम दातरंगे आदी.

निवेदनात प्रभाग क्र. ९ मधील कल्याण रोड परिसर, गणेशनगर, दातरंगे मळा, बागरोजा, हडको, बालिकाश्रम रोड परिसर, वाघमळा, बडोदा बँक कॉलनी, भिमसेनपुरा, सिद्धार्थनगर, नीलक्रांती चौक आदी भागांमध्ये अनेक ठिकाणी वीजखांब धोकादायक अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही ठिकाणी दोन टेन्शन तारांमधील अंतर अत्यंत कमी असल्यामुळे वाऱ्यामुळे किंवा पावसात त्या एकमेकांना स्पर्श करून स्पार्किंग होत असल्याने तारा तुटण्याच्या घटना घडत आहेत. तसेच अनेक ठिकाणी डी.पी. उघडे पडल्याने नागरिकांसह लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

यावेळी नगरसेविका रुपाली दातरंगे म्हणाल्या, प्रभागातील नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा महत्त्वाचे दुसरे कोणतेही काम नाही. गेल्या अनेक दिवसांपासून वीजखांब व वीजवाहिन्यांच्या धोकादायक स्थितीबाबत नागरिक सातत्याने तक्रारी करत आहेत. पावसाळ्यात या समस्या अधिक गंभीर बनतात. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा ती होऊच नये यासाठी महावितरणने तातडीने संपूर्ण प्रभागाची पाहणी करून वाकलेले खांब, तुटलेल्या तारा आणि उघडे डी.पी. दुरुस्त करणे अत्यावश्यक आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही.

संदीप दातरंगे म्हणाले कि लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या प्रत्येक अडचणीबाबत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करणे ही आमची जबाबदारी आहे. प्रभागातील प्रत्येक भाग सुरक्षित व्हावा, नागरिकांना अखंड आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा, तसेच भविष्यात कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे तातडीने करण्यात यावीत, अशी आमची ठाम भूमिका आहे. प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आम्ही व्यक्त केली आहे.

निवेदनात महावितरणने संपूर्ण प्रभागाची तांत्रिक पाहणी करून धोकादायक वीजखांब सरळ करणे, खराब व तुटलेल्या वीजवाहिन्या बदलणे, टेन्शन तारांमधील आवश्यक अंतर राखणे, उघडे असलेले डी.पी. सुरक्षित करणे तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेषतः पावसाळ्यात विजेच्या यंत्रणेमुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता निवेदनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

या निवेदनावर नगरसेवक संजय शेंडगे, नगरसेविका वैशाली नळकांडे, नगरसेविका रुपाली दातरंगे, माजी नगरसेवक सचिन शिंदे तसेच शुभम दातरंगे यांच्या स्वाक्षऱ्या असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही संयुक्त मागणी करण्यात आली आहे. प्रभागातील वीज यंत्रणा सुरक्षित करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

दरम्यान, प्रभागातील नागरिकांनीही महावितरणने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पावसाळ्याच्या काळात वीज यंत्रणेतील त्रुटींमुळे होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर पुढील काळात तीव्र पाठपुरावा करण्यात येईल, असा इशाराही लोकप्रतिनिधींनी दिला आहे.

# महावितरणच्या कारभाराविरोधात खासदार निलेश लंके यांचा 'मोर्चा'

## स्मार्ट मीटर सक्ती करु नये, शेतकऱ्यांना वेळेत वीजपुरवठा करावा आदी मागण्यांसाठी आंदोलन

नगर – शहर व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महावितरणशी संबंधित विविध गंभीर समस्या आणि जनतेच्या मागण्यांसाठी खासदार निलेश लंके यांनी ८ जुलै रोजी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला. स्मार्ट बसविण्यास सक्ती करु नये, महाविद्यालय, शाळा परिसरातील डीपी काढून टाकाव्यात, ग्रामीण भागातील लोडशेडींग बंद करावे, स्मार्ट मीटरचे विज बिले कमी करावीत व त्यासाठी कॅम्प घ्यावेत, शेतकऱ्यांना तात्काळ वीज जोड द्यावेत, अशा मागण्यांचे निवेदन अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांना खा. लंके यांनी दिले.



महावितरणला निवेदन देताना खासदार निलेश लंके यांच्यासह कार्यकर्ते.

खा. लंके यांनी यावेळी महावितरणच्या गलथान कारभारावर जोरदार टीका केली. तसेच अधीक्षक अभियंता पवार यांनाही धारेवर धरीत महावितरणच्या हलर्गीजणामुळे मृत्यूमुखी पडलेल्या प्रिती गांगुर्डे या मुलीच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्याची मागणी केली. खा. लंके यांच्या विविध मागण्यांबाबत १५ दिवसात मार्ग काढू, असे आश्वासन पवार यांनी दिले.

याबाबत लंके यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, शहरी व ग्रामीण भागात दमदाटी पद्धतीने बसवण्यात येणारे स्मार्ट मीटर त्वरित बंद करण्यात यावे. ग्राहकांना येणारी अवाजवी व वाढीव वीज बिले त्वरित कमी करण्यात यावीत. ग्रामीण भागातील अघोषित व अनियमित लोडशेडिंग तात्काळ थांबवण्यात यावे. शेतकऱ्यांचे शेतीचे व घरगुती वीज कनेक्शनचे जळालेले ट्रान्सफॉर्मर्स वेळेत मिळण्यासाठी यंत्रणा राबवावी. तसेच अतिवृष्टी व वादळी पावसामुळे नुकसान झालेले लाईटचे पोल, डी.पी. व तुटलेल्या तारा त्वरित दुरुस्त कराव्यात. पैसे भरूनही दोन-दोन वर्षे शेतकऱ्यांना सोलर न मिळणाऱ्या प्रकरणांचा निकाल लावावा आणि जास्तीचे पैसे मागणाऱ्या सोलर एजन्सींवर कडक कारवाई करावी, अशा मागण्या लंके यांनी निवेदनाद्वारे केल्या आहेत. अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी खा. लंके यांच्यासह नगरसेवक योगीराज गाडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष दीप चव्हाण तसेच शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आठरे पाटील पब्लिक स्कूल ते वडगाव गुप्ता रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी

## आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

निंबळक – आठरे पाटील पब्लिक स्कूल ते वडगाव गुप्ता हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने त्याची तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी संग्राम जगताप यांना निवेदनाद्वारे मा.उप सभापती डॉ.दिलीप पवार यांनी केली.

या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून डांबर उखडले आहे. ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या मार्गावर अनेक शाळा, महाविद्यालये व वैद्यकीय शिक्षण संस्था असल्याने हजारो विद्यार्थी, पालक व शिक्षक दररोज प्रवास करतात. तसेच परिसरातील उद्योग, व्यवसाय, बाजारपेठ आणि कामगारांची दैनंदिन वाहतूकही याच रस्त्यावर अवलंबून आहे.

परिसरातील शेतकरी व दूध उत्पादकांनाही या रस्त्याच्या दुरवस्थेचा मोठा फटका बसत आहे. शेतमाल व दूध बाजारात नेताना खड्ड्यांमुळे दूध सांडणे, वाहनांचे नुकसान होणे तसेच वेळेत माल पोहोचत नसल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होत असून रुग्णवाहिका, दुचाकी व इतर वाहनांची वाहतूक धोकादायक बनली आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने आमदार संग्राम जगताप यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने डांबरीकरण व दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी माजी सभापती रामदास भोर, भाजप नेते शामराव पिंपळे, ग्रामपंचायत सदस्य संजय भोर, लखन बैरागी, ग्रामपंचायत सदस्य उमेश डोंगरे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता त्वरित निधी उपलब्ध करून काम सुरू करण्याची मागणी केली.



आठरे पाटील पब्लिक स्कूल ते वडगाव गुप्ता रस्त्याची दुरुस्ती करावी, या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांना देताना दिलीप पवार आदी.

## मालमत्ता विक्री नोटीसीस हरकत

तमाम लोकांस विशेषत : प्राधिकृत अधिकारी अशोक सहकारी बँक लि. अहिल्यानगर यांना या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की, दि. १०/०६/२०२६ रोजीच्या दैनिक सामना या वृत्तपत्रामध्ये **प्राधिकृत अधिकारी अशोक सहकारी बँक लि. अहिल्यानगर** यांनी प्रसिध्द केलेली मौजे केडगांव ता. जि. अहिल्यानगर येथील सीटी सर्व्हे नं. १०७६ चे एकूण क्षेत्र ४६८.३० चौ. मी. व त्यावरील बांधकाम या मिळकतीची सरफेसी ॲक्ट २००२ नुसार विक्री करण्याबाबतची नोटीस आमच्या नुकत्याच वाचण्यात आली असून सदर मिळकतीच्या विक्रीस आमची हरकत आहे. वास्तविक, जि. अहिल्यानगर पोट तुकडी ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील सीटी सर्व्हे नं. १०७६ चे एकूण क्षेत्र ४६८.३० चौ. मी. व त्यावरील बांधकाम अशी संपूर्ण मिळकत श्री. काशीनाथ सोपान लिपने व सौ. मनिषा काशीनाथ लिपने यांच्या एकत्रित खरेदी मालकी वहीवाटीची मिळकत असून त्यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या सी. स. उताऱ्यावर मालक सदरी झालेली आहे. त्यांनी सदर मिळकत **अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर, पत्ता महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अहिल्यानगर** यांना दि. ०५/०१/२०२१ रोजीच्या नोंदणीकृत गहाणखत दस्त क्र. १५६/२०२१, १५७/२०२१ व १५८/२०२१ अन्वये तारण गहाण दिलेली असून सदर गहाणखतांच्या आधारे अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या कर्जाचा बोजा देखील सदर मिळकतीच्या सी.स. उताऱ्यावर फेरफार नोंद क्र. १६६१ ते १६६३ अन्वये चढविण्यात आलेला आहे. तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर यांनी देखील सदर मिळकत अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या कर्जाच्या वसुलीसाठी जप्त केलेली आहे व त्याबाबची संपूर्ण माहिती असतांना देखील **प्राधिकृत अधिकारी अशोक सहकारी बँक लि. अहिल्यानगर** यांनी बेकायदेशिररित्या सदर मिळकत लिलावाद्वारे विक्री करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. तरी तमाम लोकांस विषेशतः **प्राधिकृत अधिकारी अशोक सहकारी बँक लि. अहिल्यानगर** यांना या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की वर नमुद केलेल्या मिळकतीवर अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर च्या गहाणखतांचा बोजा असून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर यांनी देखील सदर मिळकत पतसंस्थेच्या कर्जाच्या वसुलीसाठी जप्त केलेली आहे. अशा परिस्थीतीमध्ये **प्राधिकृत अधिकारी अशोक सहकारी बँक लि. अहिल्यानगर** यांना सदर मिळकतीचे लिलाव करता येणार नाही. तरी सदर मिळकतीच्या लिलावाची प्रक्रीया त्वरीत थांबविण्यात यावी. याउपरही सदर मिळकतीची लिलावाद्वारे विक्री केल्यास, सदर विक्री ही बेकायदेशीर होईल व खरेदी घेणार यांना सदर मिळकतीमध्ये कोणतेही मालकी हक्क, हितसंबंध अथवा कब्जा प्राप्त होणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदर जाहीर हरकत प्रसिध्द केली असे.

दि. ८/७/२०२६, अहिल्यानगर.

**व्यवस्थापक**
**अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अहिल्यानगर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
डि।। अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यागर पैकी, अहिल्यानगर महानगरपालीका अहिल्यानगर यांच्या हद्यीतील मौजे सावेडी येथील बिगरशेती प्लॉट मिळकत
खालीलप्रमाणे वर्णनाची

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २६/५ | ३७ | ३०००.०० चौ.मी. |

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे
पुर्वेस- : प्लॉट नंबर ४ दक्षिणेस- : प्लॉट नंबर ५
पश्चिमेस. : प्लॉट नंबर ३६ उत्तरेस- : रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक बिगरशेती प्लॉट मिळकत यातील आरसीसी स्ट्रक्चर सहीत यातील वागणुकीचे व वहिवाटीचे सर्व हक्कासहीत तदंगभुत वस्तुसहीत काहीही एक राखुन न ठेविता ही मिळकत दिलीप शंकरराव ससे रा.हनुमान नगर,पाईपलाईन रोड,अहिल्यानगर यांचे मालकीची अशी आहे. सदरील मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याबाबत विदयमान मालक यांनी आमचे आशिल यांना खात्री व भरवसा देऊन कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.

सबब वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लिज,अन्नवस्त्र करार मदार,साठेखत अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासुन सात दिवसाचे आत खालील पत्यावर समक्ष कागदपत्रानिशी भेटुन खात्री करुन दयावी.मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार न आल्यास मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजुन आमचे आशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही.

तारीख ०८/०७/२०२६

**ॲड. अतुल गुगळे**
२४५२/८३,तेलीखुंट
मो. न ९८२२३४५९७२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये नमूद केलेली ही मिळकत कृष्णा संदेश कालें यांचे मालकी वहिवाटीची असून विद्यमान मालकांनी सदरची मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे बोलणी अंतिम झालेली आहे.

सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये त्यांचे शिवाय इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसबंध अगर बोजा नाही. अशी त्यांनी आगचे अशिलास खात्री दिली असून भरवसा दिलेला आहे. तथापी मिळकतीबाबत कोणाचेही गहाण, दान, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, विसार पावती, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा मालकी अगर इतर हक्क, हितसंबंध अगर ताबा असल्यास त्यांनी १५ दिवसांचे आत कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर पैकी मौजे वाळकी येथील शेत जमीन मिळकत गट नंबर ८५६ चे क्षेत्र ३हे.९६ आर या पैकी विद्यमान मालक कृष्णा संदेश कार्ले यांचे नावे व ताब्यात असलेली १ हे. १८ आर क्षेत्राची मिळकत
यांसी चतु:सिमा - वस्तूंसहीत महसूल रेकॉर्ड प्रमाणे त्यातील तदंगभुत वस्तूंहीत वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासुध्दा

अहिल्यानगर
ता. ०८/०७/२०२६

**ॲड. आनंद भगवानराव व्यवहारे**
ऑफिस - प्रेमदान हॉटेल मागे,
सावेडी रोड, अहिल्यानगर
मो-९८२२७९८२२३

# दारूच्या नशेत शिवीगाळ, धमक्या; नागरिक त्रस्त, कारवाईची मागणी

नगर – सावेडी परिसरातील समता चौक येथे राहणाऱ्या एका महिलेने शेजाऱ्यांच्या कथित त्रासाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात एनसी (अदखलपात्र तक्रार) दाखल केली असून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

तक्रारदार पूनम चंगेडिया (रा. समता चौक, सिव्हिल हडको, सावेडी, अहिल्यानगर) यांच्या तक्रारीनुसार, शेजारी राहणारे योगेश उर्फ सुहास बाळासाहेब जगताप, विमल बाळासाहेब जगताप आणि संध्या योगेश जगताप यांच्याकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. योगेश जगताप हे अनेकदा मद्यधुंद अवस्थेत घरासमोर येऊन तक्रारदार तसेच परिसरातील नागरिकांना अश्लील शिवीगाळ करतात. तसेच बाहेर भेटा, तुम्हाला बघून घेतो अशा स्वरूपाच्या धमक्या देत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याशिवाय, घरातील महिला विमल व संध्या जगताप या खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. यापूर्वीही नागरिकांच्या स्वाक्षरीसह पोलीस अधीक्षकांकडे निवेदने देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संबंधित व्यक्तींवर तातडीने योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदार पूनम चंगेडिया तसेच परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकतीवर बँक ऑफ बडोदा या बँकेचा बोजा आहे. त्याशिवाय इतर कोणत्याही वित्तीय संस्थेचा अगर बँकेचा, पतसंस्थेचा बोजा नाही असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा इतर कोणचेही कर्ज अगर गहाण असल्यास अगर दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती पोटगी, चार्ज, लीन इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे. असे समजून अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.**
**हि नोटीस प्रसिद्धीस दिली. ता. ०८/०७/२०२६**
**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**
**मिळकत वर्णन- जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील टि. पी. स्कीम नं. ४ मधील ''ओरो रेसिडेन्सीयल स्किम'' मधील खालील वर्णनाची मिळकत.**

| फायनल प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|
| ४४ | ६६०५.२ |
| ४४/१ | १३६६.७ |
| एकत्रीकरण नकाशाप्रमाणे फायनल प्लॉट नं. (४४+४४/१)/१+(४४+४४/१)/२ याचे एकुण क्षेत्र ७९७१.९० यापैकी पश्चिमेकडील बाजुचे प्लॉट क्षेत्र २९२८.६० चौ.मी. | |

यावर बांधलेल्या ''ओरो रेसिडेन्सीयल स्किम'' या इमारतीमधील सहाव्या मजल्यावरील अपार्टमेंट नंबर ६०५ याचे कारपेट क्षेत्र १९६.६० चौ. मीटर व २ कार पार्किंगसह ही मिळकत.
याची चतु:सिमा
पुर्वेस- पॅसेज, फ्लॅट नं. ६०४, डक्ट जीना व लिफ्ट
दक्षिणेस- साईड मार्जिन, पश्चिमेस- साईड मार्जिन,
उत्तरेस- डक्ट व फ्लॅट नं.६०१

सदर मिळकतीचे विद्यमान मालक
**१. श्री. दत्तात्रय रामधन गोळे,**
**२. सौ. सुलभा दत्तात्रय गोळे**
दोघे रा. हिवरे कोरडा गावठाण, अहिल्यानगर

**ॲड. आर. टी. शर्मा**
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर फोन नं. २३४११०६, मो. नं. ९४२२२२०८४५
ऑफीस- नं. १४, १७ पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर



श्रीधाम वृंदावन 'भागवत भास्कर' या मानद उपाधीने सन्मानित श्री कृष्णचंद्र शास्त्री ठाकुर महाराज गेल्या ५३ वर्षांपासून अखंडपणे देश-विदेशात श्रीमद्भागवत कथेची सेवा करत आहेत. त्यांनी आजपर्यंत १५५० हून अधिक यशस्वी श्रीमद्भागवत कथा आयोजित करून जगातील १५५० पेक्षा अधिक भागवत कथा करणारे पहिले कथाकार म्हणून मान मिळवला आहे. आग्रा म्युझियम सेवा केंद्राच्या प्रभारी बी.के. मधु दीदी, बी.के. माला दीदी आणि बी.के. डॉ. दीपक हरके व बी के विकास यांनी कृष्णचंद्र शास्त्री ठाकुरजी महाराज यांची स्नेहपूर्ण भेट घेतली. यावेळी त्यांनी त्यांना संस्थेच्या विविध सेवा व उपक्रमांची माहिती दिली. यावेळी त्यांना निराकार परमपिता परमात्मा शिव बाबांची फ्रेम भेट देऊन त्यांना संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय आबू राज ला भेटीचे निमंत्रण देण्यात आले.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी २ ते ३ वर्षे झाले योगाला येत आहे. योग म्हणजे जोडणे त्याप्रमाणे मी आनंद योगा क्लास मध्ये येऊन या योगा कुटुंबाशी जोडली गेली आहे. आणि आपले योग शिक्षक अनिल मेहेर सर यांच्या मार्गदर्शनाखाली योग करत आहे. योगामुळे मला खूप छान वाटते. योगाला येण्या आधी माझी खूप चिडचिड होत होती. आता योगामुळे मला खूप शांतता वाटते. माझा आत्मविश्वास वाढला आहे. व मला रोजची घरातील कामे करण्यासाठी खूप कंटाळा यायचा आता घरातील कामे करण्यासाठी कंटाळा येत नाही व कामे पण लवकर होतात.

योगास येण्या अगोदर माझी खूप कंबर दुखायची. ॲसिडीटीचा त्रास होता तो कमी झाला. माझे अंग वळत नव्हते ते आता लवचिक झाले. आणि माझे वजन पण २ ते ३ किलोने कमी झाले. आता मला योगा करताना फक्त हातांना खूप कळ लागते. आणि योगा केल्यानंतर मला खूप फ्रेश वाटते.



**- सौ. सुरेखा ताकपेरे,** अहिल्यानगर

